गुरुवार, 20 ऑक्टोबर 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक -74
Title Code : MAHMAR51117

आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 20 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-74 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-12 ● PRICE-5

# डॉलरची ‘दिवाळी’ रुपयाचे ‘दिवाळे’

## बाजारात चिंतेचे वातावरण : डॉलरने अख्ख्या जगाच्या खिशाला कात्री

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : बुधवारी रुपयाने नवा नीचांक नोंदवला असून थेट ८३ वर घसरण झाली आहे. तब्बल ६१ पैशांनी आज रुपयाचे अवमूल्यन झाले आहे. देशातून मोठ्या प्रमाणावर बाहेर जाणारी परकीय गंगाजळी आणि आंतरराष्ट्रीय बाजारात दिवसागणित अधिकाधिक सक्षम होणारा डॉलर या पार्श्वभूमीवर ही परिस्थिती ओढवल्याचे सांगितले जात आहे.**



रशिया-युक्रेन युद्धानंतर भारताने रशियाकडून तेल खरेदी केले, त्यावर अमेरिकेचे डोळे लागले आहेत. भारत, चीन आणि इतर विकसनशील देशांनी आपापल्या चलनात एकत्र व्यवसाय करायला सुरुवात केली, तर त्यापुढील मोठे आव्हान निर्माण होईल याची अमेरिकेला तेलापेक्षाही जास्त चिंता आहे. असे झाल्यास आंतरराष्ट्रीय चलन म्हणून डॉलरचा दर्जा कमी होईल.

डॉलर हे आंतरराष्ट्रीय चलन असल्याने अमेरिकेला प्रचंड फायदा होतो. अमेरिका आपला आयात अंतर कमी करण्यासाठी त्याचा वापर करते, तर इतर देशांना ही तफावत भरून काढण्यासाठी बाजारातून डॉलर्स खरेदी करावे लागतात. भारत सरकार अनेक वर्षांपासून आपले मोठे व्यवहार रुपयात करण्याचे स्वप्न पाहत आहे. त्यासाठी सध्याच्या मोदी सरकारनेही आपल्या धोरणात मोठा बदल केला आहे. जर आपण IMF च्या आकडेवारीवर नजर टाकली तर जगातील ४० टक्के व्यवहार फक्त डॉलरमध्ये होतात. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या परकीय व्यापार महासंचालनालयाने परकीय व्यापार धोरणात सुधारणा केली होती, त्यानंतर भारतीय रुपयात आर्थिक व्यवहार करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. रिझर्व्ह बँकेने भारतीय बँकांना परदेशात शाखा आणि खाती उघडण्याची परवानगी दिली, परंतु सध्या या योजनेवर अधिक वेगाने काम करण्यास वेळ लागू शकतो.

ब्रिक्स देश SWIFT व्यवहारांतर्गत डॉलरचे वर्चस्व कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत पण आतापर्यंत ते यशस्वी होताना दिसत नाहीत. डॉलरच्या मजबूतीमुळे भारतासह जगाच्या उभरत्या अर्थव्यवस्थेला अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. चीन, भारत आणि रशियाने जास्तीत जास्त स्थानिक चलनात व्यवहार करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. पण अमेरिका आपला प्रभाव वापरून डॉलरला कोणत्याही किंमतीत कमकुवत होऊ देत नाही. सोप्या भाषेत बोलायचे तर जर अमेरिकन फेडने व्याजदर वाढवले तर इतर देशांनाही व्याजदर वाढवणे भाग पडते. आता सारे जग अमेरिकेच्या डॉलरच्या वर्चस्वापासून मुक्त होण्यासाठी धावून आले आहे. दुसरीकडे, फेडच्या गगनाला भिडणाऱ्या व्याजदरांमुळे अमेरिकन नागरिक आणि अर्थव्यवस्था दुरावत चालली आहे. अमेरिकन बाजार ३० ते ४० टक्क्यांनी तुटले आहेत, पण अमेरिकेला फक्त महागाई आणि डॉलरच्या ताकदीची चिंता आहे. रशिया आणि भारत उर्वरित जगाशी स्थानिक चलनात व्यवसाय करण्यास तयार आहेत, पण अमेरिकेला आपले डॉलरचे वर्चस्व कोणत्याही प्रकारे कमी होऊ द्यायचे नाही.

### अमेरिकेची मंदीच्या दिशेने वाटचाल

पतमानांकन संस्था फिचने वर्ष २०२२ आणि २०२३ साठी अमेरिकेच्या आर्थिक वाढीचा अंदाज कमी केला आहे . अमेरिकेतील महागाई आणि मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हकडून व्याजदरात होत असलेली वाढ अमेरिकेला १९९० सारख्या मंदीकडे ढकलत आहे, असे भाकित फिचने केले आहे . पुढील वर्षी अमेरिकेची अर्थव्यवस्था केवळ ० .५ टक्के वाढेल, असा अंदाज फिचच्या अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केला आहे .

यापूर्वी जूनमध्ये १ .५ टक्के वाढीचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता . अमेरिकेत मंदीची शक्यता कमी आहे, असा अंदाज फिचच्या अर्थतज्ज्ञांनी वर्तवला आहे . परंतु २०२४ मध्ये बेरोजगारीचा दर सध्याच्या ३ .५ टक्क्यांवरून ५ .२ टक्क्यांपर्यंत वाढेल . म्हणजे लाखो नोकऱ्या बुडतील . मात्र, मागील दोन मंदीच्या तुलनेत ही संख्या कमी राहील, असेही फिच) ने म्हटले आहे . फिचने म्हटले की, पुढील वर्षभरात घरगुती उत्पन्न आणि ग्राहक खर्चात घट होण्याची अपेक्षा आहे . यामुळे २०२३ च्या दुसऱ्या तिमाहीत विकास दर घटेल . अमेरिकेत सप्टेंबरमध्ये अपेक्षेपेक्षा जास्त महागाई वाढली आहे . वाढत्या महागाईच्या दबावामुळे फेडरल रिझर्व्ह पुढील महिन्यात व्याजदर ० .७५ टक्क्याने वाढवू शकते . पुरवठ्यात सुधारणा आणि तेलाच्या किमती कमी होऊनही अमेरिकेतील चलनवाढ फेडरल रिझर्व्हच्या २ टक्क्यांच्या लक्ष्यापेक्षा वरच राहिली आहे .

**मायक्रोसॉफ्टचा १ हजार कर्मचाऱ्यांना नारळ** : दुसरीकडे अमेरिकेतील दिग्गज टेक कंपनी मायक्रोसॉफ्टने एक हजार कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे . यामध्ये विविध विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांचा समावेश आहे . कंपनीने मात्र नेमके किती कर्मचारी काढले हे सांगण्यास नकार दिला .

## महत्वाची बातमी

### नवाब मलिकांना दिलासा नाहीच

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि त्यांच्या कुटुंबियांनी बेहिशेबी मालमत्ता जमा केल्याचा आरोप करणारी याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणी अंमलबजावणी संचलनालय (ईडी) आणि सीबीआयमार्फत सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्याची मागणी करण्यात आली आहे. आज या याचिकेवर सुनावणी होणार आहे. दादरस्थित गौरी भिडे यांनी ही याचिका केली आहे. उद्धव ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांच्या चिपळूणमधील घरावर हल्ल्याचा प्रयत्न झाल्याची माहिती समोर येत आहे. त्यांच्या चिपळूणमधील घरासमोर जगड, क्रिकेटचे स्टम्प आणि काचेच्या बाटल्या सापडल्यामुळे स्थानिक परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर भास्कर जाधव यांच्या घरासमोर पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. हा विषयही दिवसभर चर्चेत राहण्याची शक्यता आहे.



## दीपोत्सव



दीपोत्सवानिमित्त बाजारात दाखल झालेले रंगबेरंगी आकाशकंदील ग्राहकांचे लक्ष्य वेधून घेत आहेत.

## चर्चेतली बातमी

### मल्लिकार्जुन खरगे काँग्रेसचे नवे अध्यक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मल्लिकार्जुन खरगे यांनी मोठ्या फरकाने थरूर यांचा पराभव केला आहे. तर निवडणुकीत ४१६ मतं बाद करण्यात आली आहेत. शशी थरूर यांनी खरगे यांचे अभिनंदन केले आहे. मल्लिकार्जुन खरगे हे निवडणूक जिंकणार असा दावा निवडणुकीपूर्वीपासूनच केला जात होता. खरगे हे गांधी घराण्याचे निकटवर्तीय आणि विश्वासू नेते आहेत. ८० वर्षांचे खरगे हे कर्नाटकातील आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी राज्यसभेतील विरोधी पक्षनेते पदाचा आधीच राजीनामा दिला आहे. निवडणुकीत ७ हजार ८९७ मतं मिळवून खरगे विजयी झाले. तर थरूर यांना १ हजार ७२ मतं मिळाल्याने त्यांचा पराभव झाला. काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीत गेल्या २४ वर्षांमध्ये प्रथमच झालेल्या काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडणुकीत सोमवारी ९६ टक्के मतदान झाले. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे आणि शशी थरूर यांच्यात अध्यक्षपदाची सरळ लढत होती. काँग्रेसचा नवा अध्यक्ष कोण? हे आज झालेल्या मतमोजणीअंती स्पष्ट झाले. गेल्या सात आठवड्यांपासून हा चर्चेचा विषय ठरला होता.

# खराब स्मार्टफोनचा मोह जीव धोक्यात घालू शकतो


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** आपला प्रिय स्मार्टफोन हा ‘खराब’ झाला तर आपण त्याच काय करता? अर्थात रिसायकलिंग करता की स्वत: जवळ ठेवताय? हा प्रश्न विचारला तर अनेकांची उत्तरे स्मार्टफोन आम्ही स्वत:जवळच ठेवतोय अशी आहेत. मात्र, सावधान! हा खराब स्मार्टफोनचा मोह आपला जीव धोक्यात घालू शकतो, असे वेस्ट इलेक्ट्रिकल एंड इलेक्ट्रॉनिक इक्विपमेंटच्या अहवालात धक्कादायक खुलासा करण्यात आलाये. डब्ल्यूईईई ही इलेक्ट्रॉनिक कचऱ्याच्या प्रतिबंधावर काम करणारी संस्था आहे. या संस्थेने अहवालात सांगितले की, आजच्या डिजिटल जगात सतत नवनवीन स्मार्टफोन लॉन्च होत आहेत. स्मार्टफोनचे जलद अपग्रेड हवामान आणि निसर्गासाठी एक मोठा धोका बनला आहे. यावर्षी भारताच्या लोकसंख्येच्या चौपट लोकसंख्येतील स्मार्ट फोन ई-कचरा बनतील. म्हणजेच, जगभरात सुमारे ५.३ अब्ज फोन फेकले जातील. यामुळे पर्यावरणावर तसेच मानवी आरोग्यावर त्याचा विपरित परिणाम कसा होऊ शकतो हे पुढील आकडेवारीवरून स्पष्ट करता येईल. ई-कचरा निर्मितीच्या बाबतीत भारत हा जगातील पाचव्या क्रमांकाचा देश आहे. भारतात दरवर्षी सुमारे एक दशलक्ष इलेक्ट्रॉनिक कचरा निर्माण होतो, ज्यामध्ये सर्वात मोठी संख्या संगणकीय कचऱ्याची असते. या कचऱ्यात ७० टक्के जड धातू आढळतात, त्यात शिशाचे प्रमाणही जास्त असते. भयावह बाब म्हणजे, भारतात एवढा ई-कचरा असतानाही केवळ १० टक्के इलेक्ट्रॉनिक कचरा जमा होतो. जगभरात १६ अब्जाहून अधिक मोबाईल फोन वापरात आहेत, जे जगाच्या लोकसंख्येच्या जवळपास तिप्पट आहे. यापैकी जवळपास एक तृतीयांश फोन वापरले जात नाहीत. पुढील सात ते आठ वर्षांमध्ये, इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक कचरा ७४ दशलक्ष टन दराने वाढेल. या ई-कचऱ्यामध्ये स्मार्टफोन तसेच इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांमधील कचऱ्याचा समावेश आहे. म्हणूनच की काय, हा कचऱ्याचा भडीमार भारतासाठी डोकेदुखी ठरतो आहे.



### स्मार्टफोनचे ‘ हे ’ घटक आरोग्यासाठी घातक

डब्ल्यूईईईच्या मते, पर्यावरणीय दृष्टीकोणातून जुन्या फोनचा गैरवापर अतिशय धोकादायक असून मानवी आरोग्यासाठी घातक आहे . अशा परिस्थितीत, या फोनच्या मौल्यवान वस्तूंचा पुनर्वापर करणे हा सर्वोत्तम मार्ग आहे . मात्र, आपला स्मार्टफोन आपल्याला प्रिय वाटतो, त्यामुळे तो फोन खराब झाला तरी कचऱ्यात टाकत नाही . याच कारणामुळे ई-कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे . खराब स्मार्टफोनमध्ये ६० पेक्षा जास्त धातू असू शकतात . आयफोनच्या पार्ट्समध्ये सोने, चांदी आणि पॅलेडियमसारखे मौल्यवान धातू देखील असतात, याबाबत लोकांमध्ये जागरूकतेचा अभाव आहे . परिणामी, स्मार्टफोन पासून होणारे धोके किवा हानी याबाबतच वापरकर्त्यांचं अज्ञान हे सुध्दा ई-कचऱ्याचे कारण असू शकते . खराब स्मार्टफोनचे हे घटक मानवी आरोग्यासाठी घातक ठरू शकतात .




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# समृद्धीचे प्रकाशपर्व

आधुनिक केसरी

पहाटेची रम्य वेळ होती. मला जाग आली होती. पण तरीही अंथरुणात तसाच पडून होतो. अशातच थोडा डोळा लागला म्हणा की काय सांगता येत नाही पण एक दृश्य माझ्या नजरेसमोरून तरळून गेले. डोळ्यासमोर कन्याकुमारीचा समुद्र होता. किनाऱ्यावर लाटा आदळत होत्या. समुद्राची गाजही ऐकू येत होती. स्वामी विवेकानंदाचे स्मारक दिसायला लागले. अचानक मला स्वामी विवेकानंद ज्या खडकावर ध्यानस्थ बसले होते, त्या ठिकाणी संत ज्ञानेश्वरांची उभी असलेली भव्य मूर्ती दिसू लागली. स्वामी विवेकानंदांच्या भव्य पुतळ्यासारखीच ती मूर्ती होती. त्या मनमोहक मूर्तीकडे पाहत असताना आणखी एक चमत्कार घडला. ज्ञानेश्वरांच्या मूर्तीचे रूपांतर एका विशाल ग्रंथात झाले. मग त्या ग्रंथाची पाने उघडून ती विस्तीर्ण समुद्राच्या पटावर पसरली. समुद्राच्या दोन्ही दिशा त्या पुस्तकाच्या पानांनी व्यापल्या. जणू पुस्तकाने आपला डावा आणि उजवा हात पसरला होता. आता मला पुस्तकातली अक्षरं तारकांसारखी दिव्य आणि प्रकाशमान दिसायला लागली. हळूहळू त्या अक्षरातून प्रकाश बाहेर पडू लागला. त्या अक्षरांची जणू रत्ने झाली. त्यांनी भोवतालच्या परिसराला व्यापले. मलाही व्यापले. हळूहळू ही प्रकाशकिरणे वाढत जाऊन संपूर्ण विश्वाला न्हाऊ घालू लागली. प्रकाशाचे कवडसे ठिकठिकाणी विखुरले. कोणाकोणाला ती अक्षररूपी प्रकाशकिरणे अनमोल रत्ने वाटली. त्यांनी वेचता येतील तेवढी रत्ने गोळा केली. मीही जमेल तेवढी ती रत्नं गोळा करण्याचा प्रयत्न केला. पण ' देणाऱ्याचे हात हजारो, दुबळी माझी झोळी ' अशी माझी अवस्था झाली. इतरांनीही ती पाहिली पण त्यांना ती रत्ने आहेत हे कळलेच नाही. त्यांनी गारगोट्या किंवा चमकणारे दगड समजून त्याकडे दुर्लक्ष केले. ज्यांनी ती रत्ने गोळा केली त्यांच्या जीवनाची वाटचाल नकळत आनंद आणि समृद्धीच्या मार्गावर होऊ लागली. देवघरचेच देणे ते !

मग ज्ञानेश्वर माउलींच्या एकेक अर्थपूर्ण ओव्या मला आठवू लागल्या. माउली पसायदानात शेवटी म्हणतात
-
आणि ग्रंथोपजीविये विशेषी लोकी इये
दृष्टादृष्ट विजये होआवे जी ।

ज्ञानेश्वर माऊलींचे अक्षर वाङ्मयावर असलेले विशेष प्रेम आपल्याला इथे दिसते. माउली म्हणतात, ' ज्यांचे ग्रंथांवर विशेष प्रेम आहे किंवा ग्रंथांवरच ज्यांची उपजीविका आहे आणि ग्रंथातील उपदेश, तत्वज्ञान ज्यांनी आपल्या जीवनात आचरणात आणले आहे, त्याचा अनुभव घेतला आहे अशा लोकांना दृष्ट आणि अदृष्ट म्हणजे आपल्या दृष्टीला दिसणारे आणि न दिसणारे अशा सर्व सुखांचा लाभ होऊन ते विजयी होवोत. **(क्रमशः)**




# आनंदी पहाट

## कलेच्या माध्यमातून सौंदर्याचा शोध

आधुनिक केसरी

आपल्या दैनंदिन जीवनात आपण नेहमीच सौंदर्याला पाधान्य देत असतो. ते मिळवण्यासाठी आपण विविध प्रकारे प्रयत्नशील असतो. ह्या सौंदर्याची व्याख्या करणे शक्य असले तरीही त्याची प्रचिती प्रत्येकाने स्वतंत्ररित्या अनुभवायची असते. व्यक्ति तितक्या प्रकृती, त्यामुळेच प्रत्येकाला सौंदर्याची प्रचिती निरनिराळ्या प्रकारे येत असते. जगण्यापलीकडचे जीवन जगणे, ही देखील एक अत्यंत महत्वपूर्ण कला आहे. आपल्या जीवन जगण्याच्या कलेतील हे सौंदर्य म्हणजे नेमके काय? ते कशासाठी आणि कसे मिळवायचे? त्यासाठी काय करावे लागते? अशा अनेकविध प्रश्नाची उत्तरे शोधण्यासाठी खरी जरूरी असते ती निरीक्षण, परीक्षण आणि समीक्षणाची; सौंदर्याचा शोध कधी संपतच नसतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

कला ही विविध गोष्टीतून आपल्याला दिसून येत असते. कला जोपासण्याचे, तिचे अस्तित्व टिकवून ठेवण्याचे काम हे आपण प्रत्येकजण निरनिराळ्या प्रकारे करत असतो. अशा ह्या कलेचे कोणकोणते उपयोग आपल्याला होतात? त्यामुळे आपली संस्कृती कशी अबाधित राहते? ह्याची जाणीव करून घेणे गरजेचे असते. एखाद्या कलाकारास त्याचे विचार जगासमोर आणायचे असतील तर ते कलेच्या विविध माध्यमातून तो आणत असतो. चित्रकला, शिल्पकला, नाट्यकला, नृत्यकला, पाककला, हस्तकला अशा अनेकविध माध्यमातून साकारलेल्या कलेतून आणि मांडलेल्या अविष्कारातून नवीन पिढीपर्यंत त्याला त्याचे विचार पोहोचवता येतात. कोणतीही गोष्ट त्याच्या कलेने करणे म्हणजे कला. एखादी कला अवगत असल्याने त्या कलाकाराला लोकप्रियता मिळते. कला निर्माण होते, ती स्वतःमध्ये असलेल्या सुप्त गुणांमुळे, कला ही विविध पर्यायांच्या रुपात दिसून येत असते, साकारली जात असते.



आधुनिक केसरी

## स्थिरावले मन । पांडुरंगी ।।

तेच माझे घर | जिथे तुझा वास ||
आणिक निवास | स्मशान ते ||१||

सहज बोलणे | असावे भजन ||
तुझेच पूजन | घडो सदा ||२||

संत सज्जनांची | घडावी संगती ||
शुद्ध व्हावी मती | विठुराया ||३||

दोन लोचनासी | दिसे एक रूप ||
द्वैत ते स्वरूप | लोपले गा ||४||

श्वासात गुंतले | तुझेच चिंतन ||
स्थिरावले मन | पांडुरंगी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी

## माये तू जरि परीक्षा घेई।


माये तू जरि परीक्षा घेई।
सांग कोण होई उतराई।
मूळीया थांबविले जलासी।
वाढ कैसी मग वृक्षांसी।
देहातूनी प्राण जाये निघोनी।
काय होणे तरी कलेवरा।
चंद्रहासे लाभली धन्यता।
आकळता तव अनन्यता।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# काव्य-चरितावली

## नम्र -निवेदन चरणाशी



आधुनिक केसरी

नम्र -निवेदन सादर करितो
काव्य-रुपात चरित्र मांडतो
गोंदवलेकर महाराजांचे दर्शन
काव्यरुपात सकलांना व्हावे
प्रयास हा गुरुकृपेने करितो ।।
थोर संत-सत्पुरुष व्यक्तिमत्व
कैसे सारे घडले ,जीवनप्रवास हा
असा परमेश्वराची इच्छा -कृपा
प्रचीती येवो तुम्हा काव्यातुनी ।।
परम दयाळू कृपाळू श्रीसद्गुरूनी
भाव माझ्या मनीचे ओळखुनी
दीप सत्संगाचा लाविता मनी
गाभार आला हो उजळूनी ।।
काव्य चरित्र श्रीमहाराजांचे लिहावे
ईच्छा फुलली ,आतुरली लेखणी
श्रीसद्गुरूची कृपा असे ही सारी
कवी अरुणदास धन्य होई मनी ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# परमात्म्याचे प्रियत्व आले की जनप्रियत्व येते

आधुनिक केसरी

परमात्म्याने आपल्याला लोककल्याणार्थ सर्व काही शक्ति द्याव्यात, असे काही माणसांना वाटते, पण अमुक एका देहामार्फत लोककल्याण व्हावे अशी इच्छा का असावी ? देहबुद्धी सुटली नाही असाच याचा अर्थ नव्हे का ? शक्ति वापरण्याचे सामर्थ्य आपल्याला आले तर परमात्मा कदाचित् ती देईलही. लहानाच्या हातात तरवार देऊन काय उपयोग ? लोकांनी आपले ऐकावे असे तुम्हाला वाटते; पण अजून क्रोध अनावर आहे, मन ताब्यात नाही, असेही म्हणता ! तर आधी आपल्या विकारांवर, मनावर छाप बसवा आणि मग लोकांबद्दल विचार करा ! तुम्हाला जनप्रियत्व पाहिजे ना ? मग जनांचा राजा परमात्मा, त्याचे प्रियत्व संपादन करा, म्हणजे जनप्रियत्व आपोआपच येईल. तुम्हाला लोक वाईट दिसतात, पण त्यांना सुधारायला जाऊ नका. तुमच्याच मनात वाईट आहे म्हणून लोक तुम्हाला तसे दिसतात. स्वतःला आधी सुधारा म्हणजे कुणीही वाईट दिसणार नाही.




लहान मुली बाहुलीबरोबर खेळतात, तिला जेवू घालतात, निजवतात. त्यांना ठाऊक असते की ही निर्जीव आहे, पण भावनेने तिला सजीव कल्पून तिच्याशी त्या खेळतात. तुम्हीही अशी भावना का करीत नाही की, परमात्मा आपल्याशी बोलतो आणि आपणही त्याच्याशी बोलतो ? ही भावना जो जो जास्त दृढ होईल, तो तो खरोखर तो तुमच्याशी बोलू लागेल. मनातून आपले नाते भगवंताशी ठेवावे. आपले सगळे जीवन जर भगवंताच्या हाती आहे, तर जीवनातल्या सर्व घडामोडी त्याच्याच हातात असणार.

आपण सात्त्विक कृत्ये करतो, पण त्यांचा अभिमान बाळगतो. सात्त्विक कृत्ये चांगली खरी, पण त्यात अभिमान ठेवला तर फार वाईट. एक वेळ वाईट कृत्ये परवडली; केव्हा तरी त्यांचा पश्चात्ताप होऊन मुक्तता तरी होईल. पण सात्त्विक कृत्यातला अभिमान कसा निघणार ? मी आप्तइष्टांना मदत केली, आणि आपइष्ट म्हणू लागले, 'यात याने काय केले ? परमात्म्याने त्याला दिले म्हणून त्याने मदत केली !' हे ऐकून मला वाईट वाटते ! इथे वास्तविक पाहता परमात्मा त्यांना आठवला, आणि मी मात्र 'मी दिले' असा अभिमान धरून वाईट वाटून घेतो ! परमात्म्याने त्यांना माझ्या हाताने दिले, हीच सत्य स्थिती असताना मला वाईट वाटण्याचे काय कारण ? म्हणून, परमात्म्याच्या इच्छेने सर्व काही घडते आहे ही भावना ठेवावी. आपण परमात्म्याजवळ मागावे की, "तू वाटेल त्या स्थितींत मला ठेव, पण माझे समाधान भंगू देऊ नकोस, माझा मीपणा काढून टाक. तुझा विसर पडू देऊ नकोस. नामामध्ये प्रेम दे आणि तुझ्या चरणी दृढ श्रद्धा सतत टिकू दे."

बोधवचन : आपले जीवन देवाच्या हाती आहे, आणि देव नामाच्या स्वाधीन आहे.

**-श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर**

# ।। दासबोध स्तवन ।।



## अनिर्वाच्य निरुपण

आधुनिक केसरी

सद्गुरूच्या चरणीं सतत राहून त्यांना शरण जाऊन, त्यांच्या तोंडचे शुद्ध आत्मस्वरूपाचे निरूपण स्मरणात ठेवून सतत जागृत रहावे. हळूहळू आत्मसाक्षात्कार होऊ लागतो. परमपदाला पोहचण्यासाठी ज्ञान, निष्ठा वलयांकारी बैठक तयार होते. आपल्याला वाटते की जागृत अवस्था म्हणजे ती हीच असते. पण हा केवळ भ्रम असतो. दृश्याचा अनुभव लयाच्या अनुभवात विरतो. शुन्याच्यापलीकडे अनुभव अनुभवरूपतेमध्ये विरून जातो. "मी अनुभव घेतो"या स्वप्नातंच असतो. 50 च्या पुढच्या ओव्यात तर "अनिर्वाच्यनिरूपण"चा थोडक्यात सारांश सांगितला आहे. तो पुढील प्रमाणे. तूं जागा झाला आहे पण तुझे स्पप्न अजूनही पूर्ण झाले नाही. "मी तो आजन्मा आहे"असे तूं स्वप्नात म्हणतो. याचा अर्थ तुझ्या जागेपणात स्वप्नाची महती संपत नाही. यालाच तर सहजस्थिती म्हणतात.सहजस्थिती असते यालाच "विवेकाचा पाया"म्हणतात. कोणत्याही बाबतीत सहजस्थिती, विवेक, वैराग्याची जाणीव नेणीव, जागृतपणे, डोळसपणे सर्वांवर समाधान मानावे ही तर विवेकाची ओळख आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# अहो आ. बोरनारे शंकरपूरला रस्ता करून देता का रस्ता

## गाव गंगापूर तालुक्यात अन् आमदारकीला वैजापूर तालुक्यात; तुला अन् मला अन् घाल कुत्र्याला अशी गावाची परिस्थिती





आधुनिक केसरी न्यूज

**गुलाब वाघ**

**गंगापूर** : तालुक्यातील शंकरपूर हे गाव शिवना नदीच्या काठावर वसलेले असून या गावाला दवाखाना, शेतीमाल खरेदी विक्री करण्यासाठी लासूर स्टेशन हे बारा किलोमीटर असणारी मुख्य बाजारपेठ असून शिवना नदीच्या पलीकडे काटेपिंपळगावमार्गे वैजापूर तालुक्यातील महालगाव हे दुसरी बाजारपेठ आहे. मात्र या दोन्ही बाजारपेठेच्या गावांना जोडण्यासाठी पक्के रस्तेच नसल्याने गावाकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यातच गाव गंगापूर तालुक्यात अन् आमदारकीला वैजापूर तालुक्यात असल्याने तुला अन् मला अन् घाल कुत्र्याला अशी गावाची परिस्थिती झाली असल्याने अहो, आ. बोरनारे सर शंकरपूरला रस्ता करून देता का रस्ता अशी परिस्थिती झाली आहे. दरम्यान शंकरपूरला जाण्यासाठी लासुर स्टेशनमार्गे गंगापूर रोडवरील सोना हॉस्पिटलपासून मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून रोडचे काम झाल्याने आगाठाण, महेबुबखेडा, भागाठाणपासून डांबरीकरण झाले आहे. मात्र वाळू वाहतुकीमुळे या रस्त्याचीही वाट लागली असून या रस्त्याने शंकरपुरजवळ दोन किलोमिटर अर्धवट रस्त्याचे काम बाकी असल्यामुळे (पवार वस्ती) जवळ रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून पावसाने पाणी साचल्याने रस्त्यात चिखल झाल्याने सध्या रस्त्यावरुन पायी चालने देखील कठीण झाले आहे. याबाबत गावाकऱ्यांनी आमदार बोरनारे यांना वारंवार विनंती केली होती. त्यावेळी आ. बोरनारे यांनी रस्त्याचे काम करून देण्याचे आश्वासन वेळोवेळी दिले होते मात्र अद्यापही रस्त्याचे काम न झाल्याने रस्त्यावरुन वाट शोधतांना कसरत करावी लागत आहे. रस्ताच चिखलमय झाल्याने नागरिकांना जाण्या-येण्यासाठी जीवाची कसरत करावी लागत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला आहे.

एक किलोमीटर रस्ता चिखलमय असल्यामुळे दैनंदिन प्रवास करणाऱ्या वाहनचालक व प्रवाशांना शंकरपुर ते महेबुबखेडा असे तीन किलोमीटर अंतरवरुन जाण्याची वेळ वाहनचालक व प्रवाशांना आली आहे. शंकरपूर, महेबुबखेडा ते शिरेगाव हा रस्ता अक्षरशा रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते असल्यामुळे पाठीचे व मानेचे हाडाची अक्षरशा चाळणी होत आहे, शंकरपूर ते भागाठाण राहिलेला एक किलोमीटर अर्धवट रस्ताचे काम लवकरात लवकर करण्यात यावे ही मागणी परिसरातील वाहनचालक व नागरिकांनी लावून धरली आहे.पावसाळ्यात या रस्त्यावर नेहमी चिखल असल्याने दैनंदिन कामासाठी जाणे-येणे कठीण झाले आहे त्यामुळे लोकप्रतिनिधिनी रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी वाहनधारक व ग्रामस्थांनातून होत आहे.



# पटसंख्येचे कारण देत शाळाबंदीचा निर्णय रद्द करा

## पँथर स्टुडंट फेडरेशनचे जिल्हा अधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे** : शिक्षण हक्क कायद्यामध्ये 6 ते 14 वयोगटातील बालकाला प्राथमिक शिक्षण एक किलोमीटरच्या आतमध्ये मिळविण्याचा हक्क कायदयाने दिलेला आहे. परंतु 20 पेक्षा कमी विद्यार्थी संख्येचे कारण दाखवत जिल्हा परिषद अंतर्गत चालणाऱ्या प्राऊमिक शाळा बंदकरुन गोर गरीबांच्या विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा दुर्दैवी व घातक निर्णय शासनाने घेतला आहे. आदिवासी समाज राहत असलेल्या परिसरामध्ये 20 पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांची संख्या अधिक आहे. हळूहळू शिक्षणाचे महत्व पटू लागलेल्या या समाजाला शिक्षणासाठी सरकारने अधिक प्रवृत्त करण्याची गरज आहे , परंतु सरकारच्या या निर्णयाने सद्यस्थितीला शिक्षण घेत असलेला आदिवासी विद्यार्थीही शिक्षणापासून वंचित राहण्याची दाट शक्यता आहे. पँथर स्टुडंट फेडरेशन या निर्णयाचा निषेध करत असून सरकारने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंडांतर आणणारा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, अशी मागणी करीत पँथर स्टुडंट फेडरेशन च्या कार्यकर्त्यांनी केली सदर उपस्तित सागर मोहीते अशोक करंजे, मायाताई पानपाटील, राकेश बेडसे, चेतन गायकवाड, अजय गव्हाणे, आकाश घोडे, आनंद अमृतसागर, शुभम पवार, यश बागुल, रोहित वाघ,राहुल गोलाईत, गोरख अहिरे, भाऊसाहेब बळसाणे, विशाल वाघ, मनोज गायकवाड, जितेंद्र भदाणे, सलमान खान इत्यादी उपस्तित होते.

# रस्त्यावर पिचकारी; आता खैर नाही

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर** : गुटखा, मावा, तंबाखू खाऊन कुठंही पिचकाऱ्या मारणाऱ्यांना त्याच ठिकाणी स्वच्छ करण्यास सांगून सोशल मीडियावर फोटोसह प्रसिध्द करण्यात येईल, आपल्या माध्यमातून अशा लोकांवर कडक कारवाई करण्यात यावी असा आदेश काढावा, अशी मागणी श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले प्रतिष्ठानकडून कोल्हापूरचे जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांना करण्यात आली आहे. पानपट्टी विक्रेत्यांनी व्यवसायाच्या ठिकाणी मोठे पिंप लाऊन तुमच्या ग्राहकाना त्यातच थुंकण्यासाठी सूचना करावी व तसे मोठे बोर्ड दर्शनी भागात लावून सहकार्य करावे ही नम्र विनंतीही करण्यात आली आहे. प्रतिष्ठानकडून जिल्हाधिकाऱ्यांना पाठण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जर रस्त्यावर, शासकीय कार्यालय, मंदीर, अपार्टमेंटस्, हॉस्पिटल्स्, सार्वजनिक वाहनातून तसेच स्वतःची वहाने, दुचाकीवरून प्रवास करताना इ. ठिकाणी जर कोणी पान, गुटखा, मावा, तंबाखू खाऊन तेथेच थुकून पिचकाऱ्या मारून तो परिसर विद्रूप केल्याचे आढळून आल्यास तसेच रस्त्यांवरून जाताना तिथेच थुंकून इतराना जो त्रास देतात आणि त्याचा जाब विचारल्यावर आरेरावीची जी भाषा करतात त्यांना तुमच्या माध्यमातून विनंती करतो की, उद्यापासून असे प्रकार निदर्शनास आल्यास त्यांना त्या ठिकाणी स्वच्छ करण्यास लावून त्यांचे फोटो फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप ग्रुपवर फोटोसह प्रसिध्द करण्यात येईल.

# ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट हेक्टरी 50 हजार भरपाई द्या

## राजेसाहेब देशमुख यांची मागणी : काँग्रेसचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई** : बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा, शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी 50 हजार रूपये नुकसान भरपाई द्या, नुकसानग्रस्त पिकांचे तात्काळ पंचनामे करून पीक विमा देखिल मंजूर करा अशी मागणी बीड जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. याबाबत काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी अंबाजोगाईचे तहसिलदार डॉ.विपीन पाटील यांच्या मार्फत जिल्हाधिकाऱ्यांना बुधवार, दिनांक 19 ऑक्टोबर रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बीड जिल्ह्यामध्ये मागील काही दिवसांपासून अतिवृष्टीने धुमाकूळ घातलेला आहे. शेती पिकांचा हाता तोंडाशी आलेला घास हा निसर्गाच्या अवकृपेने हातचा निघून गेला आहे. यापूर्वी बीड जिल्ह्यामध्ये गोगलगायीच्या संकटामुळे व लम्पी आजारामुळे शेतकरी बांधव हा खूप मोठ्या संकटात सापडलेला होता. गोगलगायी, यलो मोझॅकच्या हल्ल्यामुळे दोन - तीन वेळेला पेरणी करावी लागली होती. त्यातच बीड जिल्ह्यामध्ये पिक विमा व नुकसान भरपाई अद्याप मिळालेली नाही. त्यामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झालेला आहे .पेरणीसाठी व मशागतीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे ही



त्याला अद्याप शक्य झालेले नाही. त्यातच कसे-बसे खरीप हंगामाचे पिक काढणीला आले असताना नेमके त्याचवेळी संततधार पाऊस सुरू झाला व गेल्या आठ-दहा दिवसांपासून संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये दररोज कुठे ना कुठे अतिवृष्टी, तर कुठे मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे पूरस्थिती निर्माण झालेली आहे. सोयाबीनचे पीक संपूर्णतः पाण्याखाली गेलेले असून कापूस पिकाचे सुद्धा अतोनात नुकसान झालेले आहे. संपूर्ण खरीप हंगामातील पिके नष्ट होत आलेली आहेत व यामुळे शेतकरी वर्ग हा अतिशय मोठ्या आर्थिक संकटात सापडलेला आहे. त्यामुळे नुकसान झालेल्या शेतीच्या पिकांची तात्काळ पाहणी करून पंचनामे करावेत व नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना तात्काळ हेक्टरी 50 हजार रूपये मदत शासनाने द्यावी. अन्यथा बीड जिल्ह्यात मागील वर्षभरात मोठ्या प्रमाणावर शेतकरी बांधवांच्या आत्महत्या झाल्या आहेत. आज बीड जिल्हा हा संपूर्ण राज्यात शेतकरी आत्महत्यांमध्ये एक नंबरला असल्यामुळे या पुढील काळात शेतकरी बांधवांच्या आत्महत्यांचे प्रमाण आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे जर शेतकरी बांधवांच्या आत्महत्या रोखायच्या असतील तर झालेल्या नुकसानीचे ताबडतोब पंचनामे करून प्रती हेक्टरी 50 हजार रूपये नुकसान भरपाई शासनाने द्यावी अशी मागणी संपूर्ण बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वतीने भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून करण्यात येत आहे. असे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांचेकडून देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदरील निवेदनावर जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, शहराध्यक्ष आसेफोद्दीन खतीब, कपिल मस्के, समीर देशपांडे, प्रविण देशमुख, संजयराव काळे, बाळासाहेब जगताप, गणेश गंगणे, औचित्ते, शेख अकबर, अमर गायकवाड आदींसह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# 'एमआयएम' रिंगणात

आधुनिक केसरी

गुजरात आणि हिमाचल प्रदेशमधील विधानसभांचा कार्यकाळ येणाऱ्या सहा महिन्यांच्या आत संपणार आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाकडून नुकताच हिमाचल प्रदेशमधील निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. तर गुजरातच्या निवडणुकीचा कार्यक्रम अद्याप जाहीर केलेला नाही. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष आता निवडणूक आयोग गुजरात विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम कधी जाहीर करणार याकडे आहे. भाजपाचा गड समजल्या जाणाऱ्या गुजरातमधील निवडणुकीच्या रिंगणात भाजपा, काँग्रेससह अन्य पक्षही असणार आहेत. तर आता 'एमआयएम'नेही गुजरात विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. एमआयएमचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आणि खासदार इम्तियाज जलील यांनी ही माहिती दिली आहे. याशिवाय गुजरातमधील काही भाजपा खासदार संपर्कात असल्याचाही दावा जलील यांनी केला आहे. आम्ही गुजरात निवडणूक नक्कीच लढणार. आमचे पक्षाचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी सांगितलेले आहे की, आम्ही सर्व राज्यांमध्ये जिथे जिथे आमची ताकद आहे तिथे आम्ही निवडणूक लढणार आहोत. आम्ही गुजरात विधानसभा निवडणूक लढवण्याचा कारण म्हणजे, जेव्हा आम्ही गुजरातला गेलो होतो, तेव्हा तिथल्या महानगरपालिका निवडणुकीचा निकाल हा आमचा मनोबल वाढवणारा होता. केवळ चार-पाच शहरांमध्येच आम्ही ही निवडणूक लढलो होतो आणि आमचे २६ नगरसेवक निवडून आले होते. त्यानंतर जे ११ अपक्ष उमेदवार होते, जे विविध शहरांमधून आलेले होते, त्यांनाही आमच्या पक्षात प्रवेश केला. आमचे गुजरातचे अध्यक्ष हे काँग्रेसचे माजी आमदार आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही तिथे खूप चांगले काम केलेले आहे. असे जलील यांनी एबीपी माझाशी बोलताना सांगितले आहे.

याशिवाय लोकांना बदल हवा आहे, त्यांचा विश्वास काँग्रेसवर राहिलेला नाही. म्हणून ते एमआयएमच्या बरोबर येणार आहेत. आतापर्यंत पाच जागांची घोषणा ओवेसींनी केलेली आहे. आणखी काही जागांची घोषणा ते करणार आहेत आणि पूर्ण ताकदीने आम्ही गुजरातची निवडणूक लढणार आहोत. असेही यावेळी खासदार जलील म्हणाले. निवडणूक आयोगाकडून या दोन्ही राज्यातील निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम सोबतच जाहीर होईल, असा कयास बांधला जात होता. तसेच दोन्ही राज्यांत सोबत निवडणुका होतील आणि निकालही सोबतच जाहीर केला जाईल, असा अंदाज व्यक्त केला जात होता. प्रत्यक्षात मात्र तसे झाले नाही. यावर मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी स्पष्टीकरण दिले आहे. २०१७ साली ज्या प्रमाणे दोन्ही राज्यांचा निवडणूक कार्यक्रम वेगवेगळा जाहीर करण्यात आला होता, अगदी त्याच प्रमाणे याही वर्षी निवडणुकीच्या तारखा वेगवेगळ्या जाहीर केल्या जात आहेत, असे राजीव कुमार यांनी सांगितले आहे.

# आकाश दिवा !



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**गावाकडचे एक एक सण-उत्सव आणि प्रसंग मोठे गमतीचे असायचे. कोणत्याही गोष्टीची तऱ्हा निराळीच! परवा परवाला कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने मी आमच्या कृष्णाला घेऊन बाजारात आकाश कंदील आणायला गेलो. बाजारात विविध रंगांचे, आकाराचे आणि नावाचे दिवे झळकत होते. आता तर आकाश दिव्यांवर महापुरुषांची चित्रं सुद्धा यायला लागलीत, हे पाहून आश्चर्यच वाटलं! त्या सर्व दिव्यांमध्ये एक दिवा विशेष वाटला! अगदी लहानपणी गावाकडे दादा आणि मी जसा बनवायचो, अगदी हुबेहूब तसाच! तात्काळ मी तो दिवा दुकानदाराने संगीतलेल्या किमतीत घरी घेऊन आलो. अन हा आकाश दिवा आणतांना वेडं मन भुर्रकन गावाकडच्या लहानपणीच्या आठवणीत गुडूप झालं!**

काळ मोठा खडतर होता! कोणत्याच सोयी-सुविधा नाही. पैसे-कपडे-वह्या-पुस्तकांची प्रचंड मारामार ! असं असलं तरीही आम्ही सगळे जन सण-उत्सव मात्र मोठ्या आनंदाने साजरे करायचोच! कोजागिरीला घरच्या गाईचं पोटभर दुध प्यायला मिळायचं. त्याचबरोबर "पोरहो, यंदा आपला आकाशी दिवा लावणारहेत का नाही?" असं माय-बाबा आम्हाला विचारायचे. मग आम्ही एकमेकाकडं पाहायचो. पण त्यासाठी कोजागिरीच्या अगोदरपासूनच आकाश दिवा तयार करायची आमची गुपचूप खटपट चालू असायची! तेंव्हा गावात कुणीच आकाश कंदील विकत आणायचं नाही. सगळे पोरं घरीच, वाकडे-तीकडे, जसे जमतील तसे आकाश दिवे बनवायचे. आकाश दिवे बनवायची अन ते उंच उंच लावायची चढाओढ लागायची! कुणाचा आकाशी दिवा मोठा? कुणाचा उंच? कुणाचा रात्री उशिरा उतरून सकाळी लवकर लागतो? सगळ्या पोरांमध्ये याचीच चर्चा! आमचा आकाशी दिवा तयार करण्यासाठी नामादादा-मुरलीदादा वावरातून वेळूच्या कमट्या करून आणायचे. कमट्या करतांना वेळूची शिलक दादाच्या तळहातात आरपार घुसायची, तरीपण आकाश दिवा करायचा नाद काही सुटायचा नाही! संध्याकाळी जेवणं झाले कि, आकाश दिवा करायला सुरु. बाबा भजनाला जायचे अन माय आम्हाला गव्हाच्या पिठाची चिक्की करून द्यायची. एक एक कमटी दोऱ्याने बांधायची, त्या जोडावर पिठाची चिक्की टाकायची आणि आकाश दिव्याचा मूळ आकार तयार व्हायचा. हे एवढं करायला रात्रीचा एक वाजायचा. पारावरचं भजन मोडायचं आणि बाबा घरी यायचे. तोपर्यंत मी मायच्या मांडीवर झोपलेला असायचो. दुसऱ्या दिवशी दादा मारवाड्याच्या दुकानावरून दोन-तीन रुपयाचे लाल, पिवळा, निळा, हिरवा असे रंगीबेरंगी ताव विकत आणायचा. संध्याकाळ झाली कि उरलेला आकाश दिवा पुन्हा बनवणं सुरु. आकाश दिव्याच्या विविध बाजूच्या आकाराचे ताव दादा व्यवस्थित ब्लेडने फाडायचा आणि पिठाच्या चीक्कीने ते चिकटवायचा. दुसऱ्या दिवशी रात्री भजन मोडेपर्यंत आमचा आकाश दिवा तयार! आत्ता तो लावायची तयारी. अगोदर ठरल्याप्रमाणे सुदादा शेतातून येतांना एक उंच वेळू आणायचा. ढोरं बांधनं झाले कि आम्ही सगळे मिळून त्या वेळूच्या वरच्या भागाला ताराची मुदन करून त्यातून लांब दोरी खाली सोडून रांजणाच्या मागं ओट्यावर तुळशीच्या बाजूला तो उंच वेळू एक खुटा ठोकून त्याला गच्च बांधायचो. यात मी फक्त दर्शक असायचो, बाकी सगळं काम दादाच करायचे, फार तर मी त्यांना काही-बाही आणून द्यायचो. अशाप्रकारे आमचं आकाश दिव्याचं लाकूड उभं राहायचं. संध्याकाळ झाली की; सगळे पोरं



आपापले आकाश दिवे लावायचे. आमचा आकाश दिवा मात्र गावात सगळ्या आकाश दिव्यात मोठा अन उंच असायचा! तीन-चार जनाचं डोकं, मायच्या सुचना, चिकटवलेले रंगीबेरंगी ताव! यामुळे आकाश दिवा आणखीनच उठून दिसायचा! गावातले सगळे पोरं आमचा आकाश दिवा पाहायला यायचे अन विचारायचे, " ये मुरली, कसा केला आकाश दिवा? सांग ना? करून दे ना?" तेंव्हा दादा, "पोरहो, आता वेळ नाही गड्या, पुढंदी नक्की करून देतो!" असं म्हणून वेळ मारून न्यायचा. आकाश दिवा वर चढवतांना मोठी काळजी घ्यावी लागायची. कमट्याचा आकाश दिवा मोठा नाजूक! त्यात गोडतेल टाकून पेटवलेला दिवा हळूच ठेवायचा आणि तो झेंडा फडकवणारे लोक जसे एक दोरी ओढून दुसऱ्या बाजूचा झेंडा वर नेतात, तसाच एकदम सावकाश तो आकाश दिवा वर चढवावा लागायचा. बऱ्याचवेळा चढवतांना अर्ध्यातच आकाश दिव्यातला दिवा विझायचा. पुन्हा दिवा खाली घेऊन पुन्हा दिवा लावायचा आणि पुन्हा हळूहळू वर चढवायचा! हे मोठं जिकरीचं काम! हे करायला सुद्धा दादाच लागायचा. एकाद्या दिवशी दादा वावरातून लवकर आला नाही, तर माय मला, "बब्या, आपला आकाशी दिवा लाव बरं." म्हणून दिवा लावायला सांगायची. मग मी मोठ्या फुशारकीने गोसायाचा विलास, हनीफ भाईचा मजा, धनगराचा लंघडा नारा या दोस्तायला बोलावून आकाश दिवा लावायचो. असं वाटायचं, मी काहीतरी मोठं काम करतोय! जणू शाळेचा झेंडाच फडकवतोय! सगळे दोस्त मला मनायचे, "ईठल, जरा हळूहळू चढव, मधीच इझंल बरं!" मध्येच दिवा विझायचा. काडीपेटी संपत यायची, अन मग कुठं आकाशी दिवा चढला जायचा. वाड्यावरचे, सांगळ येटाळीतले, नागऱ्यायचे, धनगरवाड्यातले, बुधवाड्यातले सगळे आकाश दिवे दिवस मावळला की वर चढायचे आणि रात्री नऊ-दहाच्या आकारात दिव्यातलं तेल संपलं की; अपोआप विझायचे. मग रात्री कुणी उतरून घ्यायचं त कुणाचा तसाच रहायचा. रात्रभर वर राहिलेला आकाश दिवा मात्र वदाडानं ओला होऊन फाटून जायचा, खराब व्हायचा!

एकदा तर मोठा अपघात होता होता टळला! आमचा आकाश दिवा उंच अन त्याच्या खाली डाळण. आकाश दिव्यातलं तेल संपता संपता जोरात हवा आल्यामुळं आकाश दिव्यातला पेटलेला दिवा खाली डाळणावर पडला. लगेच डाळणानं पेट घेतला. आम्ही सगळे झोपेत होते, पण तेवढ्यात बाबा भजनावून येत होते. पेटलेलं डाळण पाहिलं अन त्यांनी जोरात हाक मारली, "पोरहो, उठा! आकाश दिव्यानं डाळण पेटलंय!" मायनं आवाज ऐकला अन पटकन आम्हाला उठवलं! दादानं लगेच रांजणातलं बकेटभर पाणी घेऊन डाळणावर टाकलं. आग विझली, अनर्थ टळला! तेंव्हापासून मात्र, आम्ही रात्री आकाश दिवा खाली उतरूनच झोपायचो. बाबाच्या भजनानं आम्ही वाचलो! पुढे कार्तिक महिनाभर गावात एकच चर्चा, "खंडू जायभायाच्या भजनामुळं त्याह्यचं घर पेटता पेटता वाचलं!"

आज मी महागडा आकाश दिवा आणून दारात लावलाय. त्यात एलइडी बल्ब सोडलाय. तो मस्त रंगीबेरंगी उजेड फेकतोय! छान दिसतोय! अगदी लहानपणीच्या आकाश दिव्यासारखा, अगदी गावाकडं दादा बनवायचा तसाच! मात्र गावाकडची ती चढाओढ, ते आकर्षण, ती आकाश दिवा बनवायची अन चढवायची मजा मात्र हरवलीय! आज सगळं आहे, परंतु गावाकडचा निखळ-निका आनंद मात्र हरवलाय, गावाकडच्या मातीच्या भिंतींच्या वळचणीला! आता गावाकडेही पहिल्यासारखे आकाश दिवे राहिले नाहीत. तेलाचे दिवे गायब झाले अन सगळीकडं लाईट बिल वाचवण्यासाठी छोटे, घरातल्या घरातले आकाश कंदील आले. हे सगळं बेगडी चित्रं पाहिलं की, वेडं मन हळूच मोठमोठ्या इमारतींच्या आलेशान कॉलनीतून बाहेर पडतं आणि खुशाल जुन्या गावात फिरून येतं बिचारं!

# सेवानिवृत्त साखर कामगारांची दशा आणि नवी दिशा



आहेर वा. र.
मो : 9958782982

आधुनिक केसरी

**सेवानिवृत साखर कामगारांच्या बाबतीत असा व्यापक विचार झाला पाहिजे. पगारवाढ आणि वेतनकरार याव्तिरिक्त त्यांचे प्रश्न मांडले गेले पाहिजे. कारखान्यावर काम करीत असताना त्यांचे आयुष्य यापुरताच विचार केला गेला. मात्र,आता त्यांचे कुटुंब, त्यांची मुले, निवृत्तीनंतरचे जीवन याबद्दल विचार झाला पाहिजे. इपीएस ९५ सारख्या पेन्शन योजनेतून किमान रू.१००००पर्यंत पैसे मिळावे यासाठी सरकारने पावले चलण्याची आवश्यकता आहे. सेवानिवृत साखर कामगारांच्या हितासाठी त्यांचा नक्कीच उपयोग होईल. त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आता साखरकामगार,कारखाने ,सामाजिक संस्था आणि सरकार यासाठी पुढे येण्याची गरज आहे.**

आजच्या आधुनिक काळात साखर उद्योगात काम करणाऱ्या साखर कामगार, अधिकारी यांच्या उद्याचे भवितव्यासाठी सखोल विचार करण्याची गरज आहे. साखर कारखाने हे कृषी उद्योगा संबंधित वस्त्रद्योगा नंतर दुसऱ्या क्रंमाकावरील उद्योग आहे. यापासून केंद्र व राज्य शासनास सुमारे ७-८ हजार कोटी रुपयांचा महसूल निरनिराळया कराच्या रूपाने मिळत असतो. महाराष्ट्रातील साखर उद्योगाची उलाढाल ३५-४० हजार कोटींच्या आसपास आहे.

सध्या महाराष्टात सहकारी व खासगी असे एकूण १९७ साखर कारखाने आहेत. त्यापैकी १८८ साखर कारखाने चालू होते.सरासरी अंदाजे एका साखर कारखान्यावर सर्व साधारण एक हजार ते बाराशे कामगार असतात. एका साखर कारखान्याचे क्षेत्रात साधारणतः १५ ते १६ हजार उत्पादक शेतकरी असतात. म्हणजे एकूण ३०लाख शेतकरी आणि कामगारांच्या मुलांचे भवितव्य या साखरउद्योगावर आहे. महाराष्टात साखर कारखानदारीमुळे ग्रामीण भागात आर्थिक आणि सामाजिक उन्नतीला हातभार लागला हे सत्य आहे. पण साखर कारखान्यातील कामगार ख-या अर्थाने वंचित राहिला असे दिसून येते.

कारण साखर कामगार हे केवळ आठ ते २० हजार रुपयांपर्यंत मासिक पगारावर काम करतात. ७ व्या वेतन आयोगही लागू पुर्णपणे लागू होणे अपेक्षित आहे. वेळोवेळी शंकरराव पाटील, शिवाजीराव पाटील, शरद पवार आयोग नेमले गेले.पण सध्या पगारही वेळेवर होत नाहीत. पगारवाढ, बढती हे व्यवस्थापनाचे मर्जीवर अवलंबून असते. ओव्हर टाईम, क्रशींग इन्सेन्टीव्ह, रजेचा पगार , विश्रातीगृह या सवलती व्यवस्थापनाने कालबाह्य ठरविल्या आहे असे वाटते. बोनस किमान पातळीवर दिला जातो. प्रवास भत्ता,रात्रपाळी भत्ता,धुलाई भत्त्ता,गणवेश भत्ता यासाठी स्पष्ट नियमावलीचा आभाव आहे. तसेच कंत्राटी कामगार आणि कंत्राटदार यांचेमार्फत कामे करून घेण्यात व्यवस्थापनाचा कल असतो.

घरभाडे, वीजबिल यात वाढ झालेली आहे.आरोग्य सेवा प्राथमिक उपचारापुरतीच मिळते. अनुकंपा तत्वावर नोकरी क्वचितच मिळते. मुलांच्या शिक्षणाची सोय प्राथमिक स्तरावरच संपते.त्यामुळे एकूण या क्षेत्रातील कामगारांची आर्थिक ओढाताण होते.

साखर कामगार साठ वर्ष आपल्या कारखान्यात सेवा करतो. सेवानिवृत्तीनंतरही हातात फारसे काही पडत नाही. त्यामुळे त्याचे गावं आणि नातलंग सर्व तुटलेले असतात. सेवानिवृत्त झाल्यावर तो गावी स्थिर होवू शकत नाही. तेथील परिस्थिती त्याला सामावून घेत नाही. त्याला सेवानिवृत्तीनंतर गावी साधे घरही बांधता येत नाही. हे विदारक सत्य आहे. सरकारी कामासाठी आवश्यक असलेली गावातील ओळखपत्र त्याच्याकडे नसातात. रेशनकार्ड, आधारकार्डापासून वंचित राहतात. त्यामुळे योजनांचाही फायदा घेता येत नाही. अन्य सरकारी सेवांमधून निवृत्त झाल्यानंतर मिळणाऱ्या सोयीसुविधा साखर कामगारांना नसतात. साखर कारखानदारीतील आयटीआय वर्कशॉप फिटर आणि रेल्वे वर्कशॉप फिटर यांच्या सेवानिवृतीनंतर मिळणारे फायदे याची तुलना केल्यास खुप तफावत दिसून येते.उदा. मोफत



आरोग्य सेवा,वार्षिक सहल इत्यादी बाबीत दिसून येते.

सेवानिवृत्तीनंतर मिळालेली तुटपुंजी रक्कम घेऊन तो गावाकडे येतो. तेथे आल्यावर त्याची परवड सुरू होते. रहायला घर नाही, मुले लग्नाला आलेली, त्यांना नोकरी नाही. व्यवसाय सुरू करायचा तर पुरेसे भांडवल नाही. आयुष्यभर कारखान्यावर राबल्यानंतरही गावी आल्यावर जगण्यासाठी नव्याने संघर्ष सुरू करावा लागतो.

या परिस्थितीवर मात करण्यासाठी काही उपाययोजना करण्याची गरज आहे. कामगारांच्या ज्या संघटना आहेत, त्या नोकरीवर असताना पगारवाढ किंवा अन्य मागण्यांसंबंधी काम करतात. मात्र, कामगारांच्या कौटुंबिक गरजा, त्यांच्या अन्य अडचणी आणि सेवानिवृत्तीनंतर मदत करणारी यंत्रणाम्हणून काम करत नाही. ती निर्माण होण्याची गरज आहे. अन्य क्षेत्रात जशा संघटना, संस्था, क्लब सेवानिवृत कामगारांसाठी कार्यरत आहेत, तशी सोय सेवानिवृत साखर कामगारांसाठी केली पाहिजे. सेवानिवृत साखर कामगारांच्या या गरजा पूर्ण करण्या साठी मेळावे, व्यवसाय मार्गदर्शन आणि प्रशिक्षण शिबिरे, पुरस्कार योजना, सत्कार आणि प्रोत्साहन देणारे उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, कवि सम्मेलन, चर्चासत्र, सामुदायिक विवाह, खेळ, मनोरंजन यांचे सेवानिवृत साखर कामगारासाठी आयोजन करावे. सरकारी योजनांचा सेवानिवृत साखर कामगारांना लाभ मिळवून देणे,त्यांच्यासाठी घरकुल योजना , आरोग्य सुविधा, सहकारी कामगार वसाहत याचाही विचार केला जावा. सेवानिवृत साखर कामगारांनी काही नविन गोष्टी, उदा. कॉम्प्युटर चालविणे,किराणा, जनरल स्टोअर,तयारकपडे,खते,कीटनाशके,दुध,पाणी,बॉटल,हार्डवेअर,पम्पदुरूस्ती, वेल्डींग शॉप, इलेक्ट्रीक सामान,पर्यटन यासारखे विक्री व्यवसाय करावे असे सुचवावेसे वाटते.

सेवानिवृत साखर कामगारांचे मुलांकडे दुर्लक्ष होते हे नाकारून चालणार नाही. तसेच अनेकांची मुले हुशार असतात. मात्र पुढे जाण्याचे त्यांना मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, सेवानिवृत साखर कामगारांच्या मुलांना स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, त्यांच्यातून कलावंत, कुशल अभियंते, खेळाडूही बनण्या साठी त्यांना मार्गदर्शन आणि संधी उपलब्ध करून देणारी यंत्रणा हवी.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# थायरॉईड लक्षणे-कारणे आणि घरगुती उपचार



डॉ. ज्योती शेप-सिरसाट
अंबाजोगाई, जि. बीड

आधुनिक केसरी

**अस्वास्थ्यकर खाण्याच्या सवयी आणि तणावपूर्ण जीवन जगण्यामुळे थायरॉईड संबंधी रोग होतात. आयुर्वेदानुसार थायरॉईड संबंधी रोग वात, पित्त आणि कफ मुळे होतात. जेव्हा वात आणि कफ दोष शरीरात होतात, तेव्हा त्या व्यक्तीला थायरॉईड होतो. थायरॉईडवर उपचार करण्यासाठी तुम्ही आयुर्वेदिक पद्धती वापरू शकता. वात आणि कफ दोष आयुर्वेदिक उपचारांनी संतुलित असतात. चांगली गोष्ट म्हणजे तुम्ही थायरॉईडचे घरगुती उपचार देखील करू शकता.**

## थायरॉईड म्हणजे काय?

थायरॉईडशी संबंधित रोग जसे हायपरथायरॉईडीझम किंवा हायपोथायरॉईडीझम थायरॉईड ग्रंथीमध्ये गडबड झाल्यामुळे होतात. थायरॉईडला थायरॉईड ग्रंथी असेही म्हणतात. थायरॉईड ग्रंथी मानवी शरीरात आढळणाऱ्या सर्वात मोठ्या अंतःस्रावी ग्रंथींपैकी एक आहे.ही बायसेप्स रचना आपल्या मानेमध्ये अंदाजे लॅरेन्क्सच्या खाली क्रिकोइड कूर्चाच्या समान पातळीवर आहे. थायरॉईड ग्रंथी शरीराच्या चयापचय प्रक्रियेत विशेष भूमिका बजावते. ही थायरॉईड ग्रंथी ट्री-इओदोथायरॉनीन (T3) आणि थायरॉकेलसटोनीन नावाची संप्रेरके गुप्त करते. हे संप्रेरक शरीराच्या चयापचय दर आणि इतर वाढीच्या यंत्रणेवर परिणाम करतात. थायरॉईड हर्मोन आपल्या शरीरातील सर्व प्रक्रियेचा वेग नियंत्रित करते. थायरॉईड हार्मोन्स काम करतात. थायरॉईडमुळे तुमच्या शरीराला फायदा होतो. थायरॉक्सिन हार्मोन चरबी, प्रथिने आणि कर्बोदकांमधे चयापचय नियंत्रित करते. हे रक्तातील साखर, कोलेस्टेरॉल आणि फॉस्फोलिपिडचे प्रमाण कमी करते.

हे हाडे, स्नायू, लैंगिक आणि मानसिक वाढ नियंत्रित करते. हृदय गती आणि रक्तदाब नियंत्रित करते. स्त्रियांमध्ये स्तनपान वाढवते.

## थायरॉईड रोगाचे प्रकार

थायरॉईड ग्रंथीचे दोन प्रकार आहेत.

**1) हायपरथायरॉईडीझम**

**2) हायपोथायरोडिझम**

थायरॉईड ग्रंथीची हायपरएक्टिव्हिटी ( हायपरथायरोडिझम ) थायरॉईड ग्रंथीच्या अतिसंवेदनशीलतेमुळे टी 4 आणि टी 3 हार्मोन्सचे अतिउत्पादन होते. जेव्हा हे हार्मोन्स जास्त प्रमाणात तयार होतात तेव्हा शरीर जास्त ऊर्जा वापरते. याला हायपरथायरॉईडीझम म्हणतात. ही समस्या पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये जास्त दिसून येते.

## लक्षणे

थायरॉईड संप्रेरकाच्या अतिरेकामुळे शरीरातील चयापचय वाढते आणि सर्वकाही जलद होऊ लागते. अस्वस्थता, चीडचीडपणा, जास्त घाम येणे, हात थरथरणे, केस पातळ होणे आणि गळणे, निद्रानाश (झोपेचा त्रास), स्नायू कमजोरी आणि वेदना, हृदयाचे ठोके वाढणे, खूप भूक लागल्यानंतरही वजन कमी होते, स्त्रियांमध्ये मासिक पाळीची अनियमितता दिसून येते, ऑस्टिओपोरोसिस होतो, ज्यामुळे हाडातील कॅल्शियम वेगाने कमी होते.

## अल्पास्क्री (हायपोथायरोडिझम)

हायपोथायरॉईडीझम थायरॉईडच्या अकार्यक्षमतेमुळे होतो. हे या समस्यांद्वारे ओळखले जाऊ शकते : मंद हृदयाचा ठोका, नेहमी थकवा, नैराश्य, सर्दीसाठी अधिक संवेदनशील असणे, चयापचय मंदावल्यामुळे वजन वाढते, पातळ होणे आणि नखे क्रॅक होणे, घाम येणे कमी होणे, त्वचेची कोरडेपणा आणि खाज, सांधेदुखी आणि स्नायू कडक होणे, जास्त केस गळणे, बद्धकोष्ठता, डोळ्यात सूज, पुन्हा पुन्हा विसरण्यासाठी, गोंधळलेला, समजण्यास असमर्थ, मासिक पाळीत अनियमितता, 28 दिवसांचे चक्र 40 दिवस किंवा त्यापेक्षा जास्त असेल, चेहरा आणि डोळे सूज, रक्तातील कोलेस्टेरॉलची पातळी वाढली, महिलांमध्ये, यामुळे वंध्यत्व येऊ शकते.

## थायरॉईड कारणे

थायरॉईड होण्याची कारणे अशी असू शकतात पुढीलप्रमाणे असू शकतात. अधिक तणावपूर्ण जीवन जगण्यामुळे थायरॉईड



संप्रेरकांच्या सक्रियतेवर परिणाम होतो. आहारात आयोडीनचे प्रमाण कमी किंवा जास्त झाल्यामुळे थायरॉईड ग्रंथी विशेषतः प्रभावित होतात. हा रोग अनुवांशिक देखील असू शकतो. जर कुटुंबातील इतर सदस्यांनाही ही समस्या आली असेल तर कुटुंबातील इतर सदस्यांनाही ही समस्या येऊ शकते. गरोदरपणात स्त्रियांमध्ये थायरॉईड संप्रेरकांमध्ये असंतुलन दिसून येते, कारण या काळात स्त्रियांच्या शरीरात अनेक हार्मोनल बदल होतात. अन्नामध्ये सोया उत्पादनांचा जास्त वापर केल्यामुळे.

## आयुर्वेदिक उपाय

1. यामध्ये आपण शिग्रू पत्र, कांचनार, पुनर्णवा यांचे काढा वापरू शकतो. काढा वापरण्यासाठी आपण रिकाम्या पोटी 30 ते 50 मिली काढा घ्यावे.

2. पाण्यावर जलकुंभ, अश्वगंधा किंवा विभीतकीची पेस्ट लावा. सूज कमी होईपर्यंत पेस्ट लावावी. रोगाने ग्रस्त या वनस्पतींचे रस देखील वापरले जाऊ शकते.

3. फ्लेक्ससीडचा एक चमचा पावडर या रोगामध्ये वापरता येतो.

4 . या रोगामध्ये नारळाचे तेल देखील वापरले जाऊ शकते. 1 ते 2 चमचे खोबरेल तेल सकाळी आणि संध्याकाळी कोमट दुधात रिकाम्या पोटी घेतल्याने देखील या आजारात फायदा होतो.


5. या रोगामध्ये विभिटिकाची चूर्ण, अश्वगंधाची चूर्ण आणि पुष्करबूनची पावडर देखील 3 ग्रॅम मध किंवा कोमट पाण्याने दिवसातून दोनदा वापरता येते.

6. या आजारात तुम्ही कोथिंबीर पाणी पिऊ शकता. कोथिंबीर पाणी बनवण्यासाठी, संध्याकाळी तांब्याच्या भांड्यात पाणी घ्या आणि त्यात 1 ते 2 चमचे धणे भिजवा आणि सकाळी ते चांगले मॅश करून हळूहळू प्या, ते फायदेशीर ठरेल.

7. या रोगामध्ये आपण पंचकर्म क्रिया करू शकतो ज्यात शिरो अभ्यंगम, पद अभ्यंगम, शिरोधारा, वस्ती, विरेचन, उदवर्तन आणि घशाचे क्षेत्र किंवा थायरॉईड ग्रंथी. यामध्ये आपण घरी नैश्यम करू शकतो. नास्यम करण्यासाठी, आपण गायीच्या तुपाचे दोन थेंब वितळवून नाकात टाकतो, यामुळे या आजारात फायदा होतो.

थायरॉईडवर नियंत्रण ठेवण्यासाठी तुम्हाला लाल कांद्याची गरज आहे. कांदा घ्या आणि मध्यभागी दोन भाग करा. नंतर थायरॉईड ग्रंथीभोवती घड्याळाच्या दिशेने मालिश करा. मसाज केल्यानंतर मान धुवू नका, पण रात्रभर असेच राहू द्या. कांद्याचा रस आपले काम करत राहील. हा उपाय खूप सोपा आणि प्रभावी आहे. हा उपाय काही दिवस सतत केल्याने तुम्हाला त्याचे परिणाम दिसू लागतील. म्हणूनच, आपल्या थायरॉईडवर नियंत्रण ठेवण्यासाठी, हा उपाय एकदा करून पहा.

# वन्यप्राण्यांची घटती संख्या चिंताजनक



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**दिवसेंदिवस वनक्षेत्राचे प्रमाण कमी होत चालल्याने वन्यजीवांचा नैसर्गिक अधिवास धोक्यात सापडला आहे. परिणामी वन्यजीवांच्या संख्येवरही त्याचा परिणाम होऊ लागला आहे. WWF च्या लिव्हिंग प्लॅनेट अहवालात, निरीक्षण केलेल्या वन्यजीवांच्या संख्येत सरासरी ६९ टक्क्यांनी घट झाली आहे. १९७० ते २०१८ या कालावधीत ५२३० प्रजातींच्या ३२ हजार जीवांची तपासणी करण्यात आली. त्यानुसार नदीतील प्राण्यांच्या संख्येत सरासरी ८३ टक्क्यांनी घट झाली आहे.**

**जैवविविधतेचे नुकसान थांबविण्याचे आवाहन**

१९७०ते २०१८या काळात ५२३० प्रजातींच्या ३२ हजार जीवांची ही तपासणी करण्यात आली. यामध्ये सस्तन प्राणी, पक्षी, उभयचर आणि सर्व सरपटणारे प्राणी यांचा समावेश होता. आश्चर्याची बाब म्हणजे जलचरांची संख्याही सरासरी ८३ टक्क्यांनी कमी झाली आहे.

अहवालात निसर्गाच्या स्थितीच्या चिंताजनक भविष्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे आणि सरकार, कंपन्या आणि व्यक्तींना निसर्गाच्या प्रतिकूल क्रियाकलापांमध्ये तातडीने बदल करून जैवविविधतेचे नुकसान थांबविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



**प्राण्यांच्या संख्येत सरासरी ९४ टक्के घट**

सध्या जागतिक स्तरावर पृथ्वी दुहेरी संकटाने घेरली असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. हवामान बदल आणि जैवविविधतेचे नुकसान या परस्परसंबंधित संकटे आमच्या क्रियाकलापांमध्ये केंद्रस्थानी आहेत. अहवालात असेही सूचित करण्यात आले आहे की लॅटिन अमेरिकन आणि कॅरिबियन प्रदेशात १९७० ते २०१८दरम्यान पाळण्यात आलेल्या वन्यजीवांची संख्या सरासरी ९४ टक्क्यांनी कमी झाली आहे.

**हवामान बदल हे देखील एक प्रमुख कारण आहे**

अधिवासाचा ऱ्हास आणि तोटा, वापर, आक्रमक प्राण्यांची घुसखोरी, प्रदूषण, हवामान बदल आणि रोग ही जगभरातील वन्यजीवांच्या संख्येत घट होण्याचे मुख्य कारण आहेत. याच कालावधीत, यापैकी अनेक घटकांमुळे आफ्रिकेतील वन्यजीवांमध्ये ६६ टक्के आणि आशिया पॅसिफिकमध्ये एकूण ५५ टक्के घट झाली. जलचर प्राण्यांच्या संख्येत ८३ ची घट ही कोणत्याही प्रजातींच्या संख्येतील सर्वात मोठी घट आहे.

**अनेक गाळाच्या जंगलांचे नुकसान**

एलपीआरमध्ये जंगलांच्या भूमिकेचाही उल्लेख आहे, ज्यांचे संवर्धन आणि पुनर्संचयित केल्याने जैवविविधता, हवामान आणि लोकांसाठी अनुकूल समाधान मिळू शकते. महत्त्वाचे असले तरी, मत्स्यव्यवसाय, शेती आणि किनारपट्टीच्या विकासामुळे जलपर्णी जंगलांची वार्षिक ०.१३ टक्के दराने घट होत आहे. नैसर्गिक ताण जसे की वादळ आणि किनारपट्टीची धूप, तसेच अतिवापर आणि प्रदूषण, यामुळे अनेक जलचर जंगलांचे नुकसान होते. जमीन आणि परिसंस्थेच्या सेवा कमी झाल्या आहेत. जंगलांच्या ऱ्हासामुळे जैवविविधतेचे अधिवास नष्ट होतात आणि किनारी समुदायांना पारिस्थितिक सेवांचे नुकसान होते. काही भागात ते किनारी समुदाय राहत असलेल्या भागांना नुकसान पोहोचवू शकते. अहवालात नमूद करण्यात आले आहे की, १९८५पासून, सुंदरबनमध्ये १३७चौरस किलोमीटरचे गाळयुक्त जंगले नष्ट झाली आहेत, परिणामी तेथे राहणा-या १०दशलक्ष लोकांपैकी बऱ्याच लोकांसाठी जमीन आणि परिसंस्थेच्या सेवांचे नुकसान झाले आहे.

**भविष्यासाठी सुधारणा आवश्यक आहे**

अहवालात असेही स्पष्टपणे नमूद केले आहे की जगभरातील स्थानिक लोकांचे आणि स्थानिक समुदायांचे अधिकार, शासन आणि संरक्षण यांचे नेतृत्व ओळखल्याशिवाय आणि त्यांचा आदर केल्याशिवाय निसर्ग-अनुकूल भविष्य घडवणे शक्य नाही. हे दोन धोके संवर्धन आणि पुनर्संचयित क्रियाकलाप वाढवून, विशेषतः अधिकाधिक शाश्वत उत्पादन आणि अन्नाचा वापर वाढवून आणि सर्व प्रदेशांना वेळेवर शक्य तितके कार्बनमुक्त बनवून कमी केले जाऊ शकतात. संबंधित समस्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे. WWF इंडियाचे सरचिटणीस रवी सिंग म्हणाले की, लिव्हिंग प्लॅनेट रिपोर्ट २०२२ हे दर्शविते की कसे हवामान बदल आणि जैवविविधतेचे नुकसान केवळ पर्यावरणीय समस्या नसून अर्थव्यवस्था, विकास, सुरक्षा आणि समाजाच्या समस्या आहेत. त्यामुळे तेही एकत्र सोडवायला हवे.

**भारतालाही याचा फटका बसेल**

भारतातील हवामान बदलाचा परिणाम जलस्रोत, शेती, नैसर्गिक परिसंस्था, आरोग्य आणि अन्नसाखळीवर होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. आम्हाला एक सर्वसमावेशक सामूहिक दृष्टीकोन आवश्यक आहे जो सुनिश्चित करतो की मानवी क्रियाकलापांच्या किंमती आणि फायदे सामाजिकदृष्ट्या न्याय्य आहेत आणि प्रत्येकाचा त्यात समान वाटा आहे. वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ या कायद्याची अंमलबजावणी होत नसल्याने वन्य प्राण्यांचे संरक्षण धोक्यात आले आहे. वन्य प्राण्यांचे संरक्षण, करण्यासंबंधी सामान्य नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**वन्य प्राण्यांचे संरक्षणाची गरज**

जंगलात असलेल्या अन्नसाखळीमधील वाघ हा मुख्य घटक आहे. तसेच वाघामुळे जंगलात असलेल्या वनस्पतींचे आणि इ तर तृणभक्षी प्राण्यांमध्ये समतोल राखला जातो. त्यामुळे वाघांचे संरक्षण होणे गरजेचे आहे.- वनसंपदेमुळे सर्व प्राणिमात्रांसाठी आवश्यक असलेला ऑक्सिजन, मुबलक पाणी, आणि जमिनीची धूप थांबण्यासही मदत होते. त्यामुळे जंगलांसाठी सर्व वन्यजीव वाचविणे गरजेचे आहे. - वन्य प्राण्यांच्या संरक्षणासाठी पोषक वातावरण तयार करून, त्यांचे प्रजनन वाढवून त्यांच्या संख्येत वाढ करणे हा प्रमुख उद्देश समोर ठेवून वन विभागाने कार्य करायला पाहिजे.- सध्या मोठमोठया वनक्षेत्रांमध्ये वन्य प्राण्यांची संख्या झपाट्याने कमी होत चालली आहे. त्यामुळे त्याच्या संवर्धनाकरिता वन्य प्रेमींकडून प्रयत्न होणे गरजेचे आहे.

# महाराष्ट्राचा बहुमान

आधुनिक केसरी

महाराष्ट्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड हे लवकरच भारताचे नवे मुख्य सर न्यायाधीश म्हणून शपथ घेतील. भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांनी त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून ९ नोव्हेंबर पासून ते भारताचे मुख्य सर न्यायाधीश म्हणून सूत्र हाती घेतील. विद्यमान सर न्यायाधीश उदय लळित यांचा कार्यकाळ ८ नोव्हेंबर रोजी संपुष्टात येत आहे विशेष म्हणजे विद्यमान मुख्य सर न्यायाधीश उदय लळित हे देखील महाराष्ट्राचेच आहेत याचाच अर्थ सलग दोन वेळा मराठी सुपुत्रांना देशाच्या न्यायव्यवस्थेचे मुख्य सर न्यायाधीश होण्याचा मान मिळाला आहे. याआधी चार मराठी न्यायमूर्तींना हा मान मिळाला आहे. न्यायमूर्ती प्रल्हाद गजेंद्रगडकर ( १ फेब्रुवारी १९६४ ते १५ मार्च १९६६ ) न्यायमूर्ती यशवंत चंद्रचूड ( २२ फेब्रुवारी १९७८ ते ११ जुलै १९८५ ) न्यायमूर्ती शरद बोबडे ( १८ नोव्हेंबर २०१९ ते २३ एप्रिल २०२१ ) आणि विद्यमान सर न्यायाधीश उदय लळित ( २७ ऑगस्ट २०२२ते ८ नोव्हेंबर २०२२ ) या चार मराठी जनांनी हे पद भूषविले आहे. यातील न्यायमूर्ती यशवंत चंद्रचूड हे धनंजय चंद्रचूड यांचे वडील आहेत. याचाच अर्थ वडील आणि मुलगा देशाचे सर न्यायाधीश होण्याचा अनोखा योगायोग या निमित्ताने घडला आहे. न्यायमूर्ती यशवंत चंद्रचूड हे सात वर्ष देशाचे सर न्यायाधीश होते हा एक विक्रमच आहे त्यांचे सुपुत्र न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांना २ वर्षाचा कार्यकाळ मिळणार आहे अर्थात हा कार्यकाळ देखील खूप मोठा आहे त्यामुळेच त्यांचा कडून मोठ्या अपेक्षा आहेत. न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड हे सर्वोच्च न्यायालयात नियुक्त होण्यापूर्वी अलाहाबाद उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश होते तसेच ते मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती देखील होते. दिल्ली विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतल्यानंतर कायद्या संदर्भात पुढील शिक्षण घेण्याकरिता ते हार्वर्डला गेले तेथून आल्यावर त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकील म्हणून काम केले. त्यानंतर त्यांची मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली त्या अगोदर काही काळ त्यांनी पश्चिम भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल

श्याम ठाणेदार
संपर्क क्र. 9922546295

म्हणूनही काम केले. वकील आणि न्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांचा अनुभव दांडगा आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती या नात्याने न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी सर्वात जास्त वेळा घटनेशी संबंधित मुद्द्यांच्या सुनावणीसाठी नेमण्यात आलेल्या घटना पीठावर काम केले आहे. राज्यघटना, मानव अधिकार, जनहित याचिका, गुन्हेगारी कायदा, वाणिज्य कायदा अशा विविध विषयांवर त्यांनी आपले निकाल दिले आहेत. राम जन्मभूमी वादा संदर्भात २०१९ साली ५ सदस्यीय खंडपीठाने जो एकमताने निर्णय दिला त्या खंडपीठात न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड हे देखील होते. प्रायव्हसी ( खाजगी ) हा मूलभूत अधिकार असल्याचा ऐतिहासिक निकाल देखील न्यायमूर्ती चंद्रचूड यांनीच दिला आहे. याशिवाय अनेक ऐतिहासिक आणि महत्वपूर्ण निकाल न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी दिले आहेत. त्यांच्या निवडीचा तमाम मराठी माणसांना अभिमान आहे. देशाच्या मुख्य सर न्यायाधीशपदी झालेली त्यांची निवड म्हणजे महाराष्ट्राचा बहुमान आहे.



# तर भारत महासत्ता व्हायला वेळ लागणार नाही



चेतन राजहंस
संपर्क : 7775858387

आधुनिक केसरी

**भारताने नुकताच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला. 'गेल्या 74 वर्षांमध्ये भारताने काय मिळवले आणि काय गमावले?', याचेही या निमित्ताने विचारमंथन व्हायला हवे. त्यासह 'भविष्यात प्रगतीपथावर जाण्याच्या दृष्टीने कोणती पावले उचलायला हवीत ?', हेही पाहणे तितकेच महत्त्वाचे ठरेल. प्रस्तुत लेखातून भारत महासत्ता होण्यासाठी दृष्टीने विचारमंथन व्हावे आणि त्यादृष्टीने प्रयत्न व्हावे याच उद्देश्याने हा लेख लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.**

आज भारतात लोकशाही राज्यव्यवस्था लागू असली,तरी भारतात 'आदर्श राजा' आणि 'आदर्श राज्य' म्हणून कुणाचा उल्लेख केला जात असेल,तर तो प्रभु श्रीराम अन् त्यांच्या रामराज्याचा केला जातो. भारताच्या प्राचीन इतिहासातील राजांच्या काळात भारत सर्वोच्च प्रगतीच्या स्थानावर होता. विविध कला,विद्या, तसेच संस्कृती यांचा विस्तार झालेला होता. व्यापार आणि कृषी भरभराटीस होते अन् सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रजा सुखी होती,याचे एका वाक्यात वर्णन करायचे झाले, तर 'भारतातून सोन्याचा धूर निघायचा' किंवा भारताला 'सोने की चिडीया' म्हटले जात असे. भारतात पूर्वी गुरुकुल शिक्षणपद्धत अस्तित्वात होती. चित्रकला, शिल्पकला,संगीत, नाट्यकला, वास्तूशास्त्र, ज्योतिर्विद्या, तसेच आयुर्वेद आणि अभियांत्रिकी या अन् अशा विविध विषयांचे किंवा विविध क्षेत्रांशी संबंधित असणारे शिक्षण दिले जायचे. प्राचीन काळी भारताची सीमा इराणपासून, अफगाणिस्तानच्या हिंदुकुशपासून अरुणाचलपर्यंत आणि काश्मीरपासून श्रीलंका, म्यानमार, थायलंड आणि इंडोनेशियापर्यंत होती असे मानले जाते. भारताशेजारील आताचे अनेक देश एकेकाळी भारताचा भाग होते आणि तेव्हाच्या भारताला अखंड भारत असे म्हटले जाते.

त्यानंतर गत 1300 वर्षांत झालेल्या इस्लामी, तसेच युरोपीय ख्रिस्ती राज्यकर्त्यांनी भारतावर आक्रमण करून अर्थसंपन्न भारताची पुरेपूर लूट केली. पूर्वीच्या काळी असणारी गुरुकुल पद्धत नष्ट करून मेकॉलेने स्वतःची शिक्षणपद्धत भारतात राबवली आणि त्या माध्यमातून राष्ट्राची संस्कृती अन् सभ्यता नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. सद्यस्थितीत केवळ विदेशी आक्रमकांनी नव्हे तर, देशाच्या लोकशाही व्यवस्थेतील सत्ताधिकाऱ्यांनीच भारताला प्रचंड प्रमाणात लुटल्याचे विविध घोटाळ्यांतून लक्षात येते. काही अपवाद वगळता भारतातील कोणत्याही नेत्याचे नाव घेतले की, त्यासोबत त्याच्या काळातील घोटाळ्याचे नाव त्वरित पुढे येते. आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण यांच्या हव्यासापोटी मनुष्य निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न करत आहे. आज संपूर्ण देश 'फ्री काश्मीर'(स्वतंत्र काश्मीर), नागरिकत्व सुधारणा कायदा, गोहत्या, धर्मांतर, जिहादी आतंकवाद,जातीयवाद, दंगली, लव्ह जिहाद, हलाल जिहाद आणि यांसारख्या अनेक सूत्रांमध्ये भरडला जात आहे. त्यात खून, चोरी, बलात्कार यांसारख्या घटनांचीही भर पडत आहे. देशात राहूनसुद्धा काही समाजकंटक तिरंग्याचा अपमान करत आहेत, देशविरोधी घोषणा देत आहेत. अनाचार, भ्रष्टाचार यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. महागाईने तर उच्चांक गाठला आहे. निसर्गाविरुद्ध गेल्यामुळे माणसांना पूर, भूकंप, दुष्काळ यांसारख्या आपत्तींना सामोरे जावे लागत आहे. चीन, पाकिस्तान प्रश्न अजून सुटलेले नाहीत.



भारत आज महासत्ता होण्याचे ध्येय बाळगून आहे; जोपर्यंत देश, संस्कृती आणि समाज यांकरिता हितकारक धोरणे खंबीरपणे राबवणारे नेतृत्व मिळत नाही, तोपर्यंत हे शक्य नाही. 'विकास कि सुरक्षितता', 'फुटीरतावाद्यांशी चर्चा कि आक्रमक आणि सडेतोड भूमिका' अशी धोरणे स्पष्ट नसल्याने देशात काय कारभार चालू आहे, हे आपण पहात आहोत.जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहतांना भारतीय नेत्यांनी ही गोष्ट विचारात घ्यायला हवी.

केवळ शस्त्रे आणि व्यापारी संबंध दृढ करण्यापर्यंत सीमित न रहाता एवढ्या प्रतिकूलतेत राष्ट्ररक्षण करणाऱ्या इस्रायलच्या राज्यकर्त्यांची विजिगीषू वृत्ती, शिस्तप्रिय नागरिकांचे राष्ट्रप्रेम हेही आयात केल्यास भारत खरोखरच महासत्ता होण्यास वेळ लागणार नाही. त्यामुळे आता आपण इस्रायलची रणनीतीही आयात करणे आवश्यक आहे. पाक, चीन, बांगलादेश आदी देशांना इस्रायली पद्धतीने धडा शिकवल्यास पुन्हा भारताकडे डोळे मोठे करून पहाण्याचे धाडस होणार नाही.

आज प्रत्येक भारतियाच्या मनात कणभर जरी देशभक्ती रुजवली, तरी देशातील अशा प्रकारची देशद्रोही कृत्ये नक्की अल्प होतील. स्वातंत्र्यवीर सावरकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, लोकमान्य टिळक अशा अनेक महापुरुषांनी उच्चशिक्षण घेऊनसुद्धा स्वतःच्या शिक्षणाचा उपयोग ब्रिटिशांची चाकरी करण्यासाठी केला नाही. त्यांनी शिक्षणाचा उपयोग आपल्या देशाच्या कल्याणासाठी केला आणि देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.

खरेतर तिरंग्याच्या विरोधातील घोषणा, देशाचा अपमान करणारी कृत्ये, आपल्या सैनिकांवर होणारे परकियांचे आक्रमण या सर्व घटनांमुळे आज देशातील युवकांनी पेटून उठायला हवे होते. दुर्दैवाने असे काहीच घडत नाही आणि याचा पुरेपूर लाभ देशाचे तुकडे करू पहाणारे देशद्रोही लोक घेत आहेत. असेच प्रकार जर चालू राहिले, तर आपल्या देशाची अधोगती होऊन आपण पारतंत्र्यात जायला वेळ लागणार नाही. त्यासाठी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या स्वप्नातील स्वाभिमानी भारत निर्माण करण्याची आवश्यकता आहे. आपल्या शिक्षणाचा उपयोग राष्ट्रकार्य आणि सामर्थ्यवान भारत घडवणे यांसाठी केला पाहिजे.'माझा थोडातरी वेळ मी माझा देश घडवण्यासाठी देईन', असा निर्धार केला, तर आपला भारत महासत्ता व्हायला वेळ लागणार नाही.

प्रत्येकाने आज स्वतःचा विचार कमी करून राष्ट्र आणि धर्म यांचा विचार करायला हवा अन् या सेवेत स्वतःला समर्पित करायला हवे. तरच भारत जागतिक महासत्ता बनेल. पूर्वीच्या काळी समाज सात्त्विक होता, त्यांना योग्य-अयोग्य याची जाण होती आणि म्हणूनच भारत महासत्ता होता. भारताला पुन्हा महासत्ता बनवायचे असेल, तर धर्मशिक्षण देऊन समाज सात्त्विक होणे, हेही तितकेच आवश्यक आहे. म्हणजेच परकीय संस्कृतीचे अंधानुकरण करण्यापेक्षा तरुणांनी साधना आणि धर्माचरण केल्यास धर्माधिष्ठित राज्य म्हणजेच ईश्वरी राज्य येईल, त्यातून भारत निश्चितच महासत्तेकडे जाऊ शकतो.

# अबब... तुम्ही किती भयंकर पदार्थ पोटात ढकलता ?

आधुनिक केसरी

**(मागील अंकावरून पुढे)**

प्राण्यांना याचा वापर केल्यास त्यापासून ड्रग्ज रेजिस्टन्स बॅक्टेरियाच्या स्वरूपात ते समोर येतात. डॉक्टरांनी विनाकारण दिलेले अँटिबायोटिक किंवा फार्मिंग चिकनच्या माध्यमातून या बॅक्टेरिया मानवाच्या शरीरात गेल्यास सध्या अस्तित्वात असलेले अँटिबायोटिक कसे काम करतील हाच प्रश्न आहे. ही रेजिस्टन्स आईच्या पोटातून बालकाच्या शरीरात गेल्याने दरवर्षी भारतात सुमारे ५७ हजार नवजात बालके मृत पावतात ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. सेंटर फॉर सायन्स अँड इन्व्हायरमेंट(CEC) यांनी अभ्यास करून फेब्रुवारी २०१८ ला जो रिपोर्ट जारी केला त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, भारतात चिकन फार्मिंग साठी तब्बल २७०० टन अँटिबायोटिक वापरले जातात ही नक्कीच धक्कादायक बातमी आहे. ब्युरो ऑफ इन्व्हेस्टीगेटीव्ह जर्नालिझमच्या वेबसाईटवर आलेल्या रिपोर्ट नुसार त्यांनी असा दावा केला आहे की, कोंबड्यांना विविध रोगांपासून वाचवण्यासाठी चिकन फार्मिंग मध्ये कोलस्टी अँटिबायोटिकचा पण वापर सुरू आहे. याच्या वापरामुळे कोंबड्याचे वजन वाढते त्यामुळे जास्त नफा मिळतो. मात्र खरी गंभीर परिस्थिती ही आहे की, हे अँटिबायोटिक मानवाला सगळे पर्याय संपल्यानंतर दिले जाते. हे मानव आणि पर्यावरणसाठी विष मानले जाते. कोलस्टीनला डॉक्टरी भाषेत ' लास्ट होप अँटिबायोटिक ' म्हटले जाते. भारतात १९४० पासून कोंबड्याना आर्सेनीक दिलं जातं. कमी खाद्य घालूनही वजन व आकार वाढविण्यासाठी आर्सेनिकचा वापर केला जातो. वेस्ट बंगाल युनिव्हर्सिटी ऑफ फिशडीज अनिमल सायन्सेस या संशोधक संस्थेने एक संशोधन अहवाल जाहीर केला आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, चिकन फार्म मध्ये पाळलेल्या कोंबडयांच्या चिकन मध्ये प्रमाण ० ते ७.७ पीपीएम आहे तर अंड्यात याचे प्रमाण ० ते ३.८ पीपीएम आहे. हे प्रमाण निर्धारित प्रमाणापेक्षा जास्त आहे.

हा त्रास फक्त चिकन खाणाऱ्यांच नाही तर कोंबडीचे खत शेतात टाकल्यानेही होऊ शकतो. कोंबडी खत शेतात टाकल्यास आर्सेनिक पिकात शोषले जाते. ७० ते ९० टक्के आर्सेनीक पाण्यात विरघळते. त्यामुळे मातीतून ते सहज पिकात शोषले जाते. त्यामुळे ड्रग कंट्रोलर fssci ने त्याची मंजुरी मागे घ्यायला हवी. भारत सोडला तर सगळ्या जगात आर्सेनिक वर बंदी आहे मात्र भारतात त्याचा वारेमाप वापर सुरू आहे. यासाठी जगभराचे डॉक्टर्स व आहारतज्ञ शाकाहाराचा पुरस्कार करतात. शाकाहार हाच मानवी शरीर शास्त्राच्यादृष्टीने योग्य आहे असं त्यांचं म्हणणं आहे. अमेरिकेतील हॉवर्ड विद्यापीठात यासंदर्भात संशोधन झालं आहे. दीड ते दोन वर्षाच्या मुलांवर केलेल्या प्रयोगातून असे सिद्ध झाले आहे की, मुलांना शाकाहारच आवडतो. आजारी असताना विविध प्रकारचे वनस्पती जन्य पदार्थ घेतात. काही टाळतात. शिजवलेल्या आहारापेक्षा कच्चा न शिजवलेला आहारच त्यांना जास्त आवडतो असा निष्कर्ष निघण्याचं कारण आपल्या शरीर रचनेतच आहे. यासाठी मांसाहारी प्राण्यांची शरीर रचना शाकाहारी पेक्षा कशी वेगळी आहे याची तुलना केली तर आपल्या लक्षात येईल. मांसाहार करणारे मांसाहार करण्याचे खूपच हास्यास्पद समर्थन करतात की, जीव, जीवस्य, जीवनम म्हणजे सगळे प्राणीमात्र एकमेकांवर अवलंबुन आहेत असे तर आपल्या धर्मातच आहे. असेलही परंतु त्यासाठी निसर्गाने अन्नसाखळी तयार केली आहे त्यात मानव किंवा शाकाहारी ही एक साखळी आणि दुसरी मांसाहारी प्राण्यांची साखळी आहे. आता मानव मांसाहारी प्राण्यांच्या म्हणजे पशूंच्या साखळीत येतच नाही. मानव हा तर फळे व अन्न धान्य खाणाऱ्या प्राण्यांच्या साखळीत येतो. काही असे बालिश प्रश्न विचारतात की, बोकडांचे करायचे काय ? तर बोकड हा पण मांसाहारी प्राण्यांच्या साखळीत येतो त्यामुळे त्याचे काय करायचे हे वाघ, सिंह बघून घेतील. मांसाहारी प्राण्यांची शरीररचना शाकाहारी पेक्षा कशी वेगळी आहे हे तुलनेने आपल्या लक्षात येईल. मांसाहारी प्राण्यांचे दात टोकदार व लचके तोडणारे असतात. नखे तीक्ष्ण असतात. शाकाहारीचे दात जाड व पसरट असतात. नखे तीक्ष्ण नसतात. मांसाहारीचा जबडा केवळ वर आणि खाली हलतो, ते अन्न चावून न खाता गिळून घेतात. शाकाहारीचा जबडा वर खाली, डावी, उजवीकडे हलतो. पुढे मागेही हलतो. मांसाहारी प्राण्यांची जीभ खडबडीत असते. पाणी पितांना ते जीभ बाहेर काढतात. चावून अन्न प्रदार्थ पितात तर शाकाहारीची जीभ जड असते, खडबडीत नसते ते ओठांनी पाणी पितात, जीभ बाहेर काढत नाही.



मांसाहारी प्राण्याच्या आतड्याची लांबी कमी असते. ती जवळजवळ त्याच्या शरीराच्या लांबीइतकी असते म्हणूनच ते मांसाहार शरीराबाहेर सहज टाकतात त्यामुळे त्यांच्या शारीरात मांसाहार कुजत नाही, त्यातून विषारी द्रव्य निर्माण होत नाही. शाकाहारी प्राण्याच्या आतड्याची लांबी त्याच्या शरीराच्या लांबीच्या चारपट व मणक्याच्या लांबीच्या बारा पट असते त्यामुळे ते मांसाहारी अन्न शरीराच्या बाहेर सहज टाकू शकत नाही, ते अन्न आतड्यात कुजते, त्यातून विषारी द्रव्य बाहेर पडून शरीरात भिनतात. मांसाहारी प्राण्यांचं यकृत आणि मूत्रपिंड शाकाहारी पेक्षा मोठं असतं, त्यामुळे मांसाहारामुळे निर्माण झालेली दूषित द्रव्ये शरीराबाहेर लवकर टाकू शकत नाही. मांसाहारीच्या जठरात शाकाहारी पेक्षा दहापट हायड्रोक्लोरिक ऍसिड असतं म्हणून ते सहजगत्या मांसाहार पाचवतात. मांसाहारीच्या लाळेत ऍसिड जास्त तर शाकाहारी मध्ये अल्कली जास्त असते. शाकाहारीच्या लाळेत रायलीन हे द्रव्य असतं ते अन्न पचनाला मदत करते. रक्ताची रासायनिक स्थिती मांसाहरित आम्लतेकडे झुकणारी व शाकाहारीची अल्कलीकडे झुकणारी असते. मांसाहरिचा आवाज भयप्रद, जाडाभरडा तर शाकाहारीचा आवाज कोमल असतो. जॉन हॉपकिन्स विद्यापीठाच्या डॉ.ॲलन ऑकर यांनी दातावरील प्रदीर्घ संशोधनंतर असा निष्कर्ष काढला की, मानव हा फळे खाणाऱ्या प्राण्यांचा वंशज आहे. यामुळे शाकाहार हाच मानवाचा नैसर्गिक आहार आहे. इतर शाकाहारी प्राण्यांना आपण शाकाहारीच आहोत हे कळतं. जसं माकडाला कित्येक दिवस उपाशी ठेवलं तरी ते मांसाला शिवत नाही असं प्रयोगातून सिद्ध झालं आहे. सिंह कधीच गवत खात नाही. शेळी, गाय कधीच मांस खात नाही. माणूसच काय तो असा प्राणी आहे की ज्याला आपण शाकाहारी आहोत हे वास्तव टाळायचं आहे. अजूनही माणसाने नैसर्गिकरीत्या योग्य असा शाकाहारच घेतला तर तो कित्येक रोगांना दूर ठेवू शकेल. काही मांसाहारी असा युक्तिवाद करतात की सर्वांनीच जर शाकाहारी व्हायचं ठरवलं तर जगातील अन्नधान्य संपून जाईल. हा अत्यंत खोटा प्रचार आहे. स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी न्यूआर्क मध्ये मध्ये विकसनशील देशांची अन्नसमस्या यावर बोलताना म्हटलं होतं की, एक किलो मांस तयार व्हायला ७० किलो गवत खर्ची पडतं, जर हे ७० किलो गवत तयार करायला लागणारी जमीन वापरली तर माझ्या सारख्या गरीब देशातील ७० टक्के लोक एकवेळचं अन्न घेऊ शकतील. आपल्या आहारातील मांसाहार वर्ज्य करून शाकाहार घेतला तर धान्य, डाळी, भाज्या, मुळं, कंद, फळे, दूध यातून आवश्यक ती प्रथिने स्निग्धांश उष्मांक मिळत असतो. कच्च्या भाज्या, फळांमुळे, विकार बरे होतात व तंतुमय पदार्थांमुळे पचनक्रिया सुधारते. शाकाहारमांसाहाराच्या योग्य योग्यतेचा आणि आपल्या शरीर रचनेचा विचार केला तर आपल्याला शाकाहाराचे महत्त्व पटेल. निसर्गात ढवळाढवळ न करता सर्वांनीच मांसाहार टाळला पाहिजे व आज तेच योग्य आहे.

**टिप :** नागरिकांना शाकाहाराचे महत्व कळावे या हेतूने हा लेख अनेक संदर्भातून संकलित करून आपल्यापुढे एकत्रितपणे मांडला आहे. या लेखातील संपूर्ण मत माझे नाही. ती जबाबदारी संबधीत वेगवेगळ्या लेखकांची, रिसर्च संस्थानांची आहे.



किरणकुमार आवारे
संपर्क क्र. 9423086021

# क्रीडा शिक्षकांची दिवाळी गोड होऊ द्या

आधुनिक केसरी

**मागील दोन वर्षापासून कोरोना सावटामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान हे अतोनात झालेले आहे. हे पण विसरुन चालणार नाही. आता कोरोना सावटाची भिती, आलेली मरगळ झटवूâन शिक्षकांनी ज्ञानदानाच्या कार्यात नव्या दमानं, नव्या जोमानं, नव्या उमेदीनं, नव्या दिशेनं स्वतःला झोवूâन देण्याची आजची खरी गरज आहे. का तर मागील कोविड-१९ जन्य परिस्थितीतील विद्यार्थ्यांचे झालेले शालेय नुकसान भरुन निघाले पाहिजेत**



त्यात मग कला गुणांना वाव देणारे, कौशल्य प्रधान शिक्षण हे दिले गेलेच पाहिजे. परंतु या शिक्षणाचे सध्या तरी तीन तेरा वाजलेले दिसते. का तर २००९ च्या जी.आर.नुसार सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत राज्य शिक्षण विभानाने आदेश निर्गमित केले की, राज्यातील सर्व जि.प. शाळा, मनपा शाळांवर एटीडी, सीटीसी क्रीडा शिक्षण विद्यार्थ्यांना देणे बंधनकारक अनिवार्य आहे. त्यानुसार जी.आर काढून २०११-१२ ला जि.. व मनपा शाळांवर १८ हजार निदेशकांच्या नेमणुका कल्या. परंतु दोन वर्षे सेवेचा कालावधी झाल्यानंतर हे पद, हे वंत्राटीकरण, टेंपररी आहे या सबबीखाली या सर्व निदेशक शिक्षकांना पुढील नियुक्त्या दिल्याच नाही. चालु नोकरीवरुन कमी करण्यात आले. या सर्व निदेशकांना न्याय मिळावा व रोजी रोटी मिळावी म्हणून उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या प्रकरणाचा २०१४ लाच उच्च न्यायालयाने (औरंगाबाद) निकाल दिला की, या सर्व निदेशक शिक्षकांना शासकीय नियमावली सेवाशर्ती अटीनुसार कायमस्वरुपी रुजू करुन घ्या. परंतु भाजप सरकार तत्कालीन माजी मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस, माजी शिक्षणमंत्री मा. विनोदजी तावडे यांनी या आदेशाला पायदळी तुडवून केराची टोपली दाखवली. तेंव्हापासून तर आजपर्यंत ८ ते ९ वर्षे होत आली या सर्व निदेशक, शिक्षकांना पुढील नियुक्त्या न दिल्यामुळे ते उपासमारीच्या खाईत जीवन जगत आहे. तसेच मागील ८ वर्षापासून या तिन्हीही विषयाचे हे निदेशक शिक्षक शाळेत शिकवायला नसल्यामुळे विद्यार्थ्यांचेही कला-कौशल्य गुणवत्ता प्राधान शिक्षणाचे फार मोठे नुकसान होत आहे.

एकीकडे सरकार राज्य शिक्षण विभाग म्हणते की, कला, क्रीडा, कार्यानुभव शिक्षण देणे हे शाळांना बंधनकारक आहे. तर दुसरीकडे या शिक्षणाची पायमल्ली करुन, सरकार काय साध्य करु पाहते हे समजण्यास मार्ग नाही. हे असे सरकारचे, शिक्षण विभागाचे धरसोडीचे धोरण आणखी किती दिवस चालणार ? कला, क्रीडा, कार्यानुभव या विषयाचा, शिक्षणाचा गांभीर्याने कधी विचार करणार ? मागे जे झाले ते झाले, परंतु आता या महाविकास आघाडी सरकारमुळे सर्व कला, क्रीडा, कार्यानुभव निदेशक शिक्षक बांधव, भगिनींच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत का तर या सरकारने हा ज्वलंत प्रश्न सोडवण्यासाठी सकारात्मकता दाखवून त्यानुसार पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. तसेच प्रामुख्याने महिला संघटना, पदाधिकारी, इतर पदाधिकारी व समाजसेवक या सर्वांनी हा प्रश्न मार्गी लावावा म्हणून मागील एक वर्षापासून अविरत, सदैव प्रयत्नांची पराकाष्टा करुन संघर्ष करत आहे. त्या सर्वांच्या प्रयत्नांना आता कुठे यश येऊन हा प्रश्न सुटण्याच्या अंतिम टप्प्यात आलेला आहे. का तर मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा.शिक्षणमंत्री या सर्वांनी प्रश्न सोडवतो, मार्गी लावतो अशी होकारात्मक प्रतिक्रीया आश्वासने देत आहे. पण प्रत्यक्षात प्रश्न अजुनही सुटलेला नाही. असे म्हटले जाते की, कोर्टाची तारीख पे तारीख चालु असते. समस्या मात्र सुटत नाही. त्यानुसार मागील १० महिन्यापासून राज्यसरकारच्या वतीने मंत्रालयात मिटींग पे मिटींग चालु आहेत पण प्रत्यक्षात प्रश्न सोडवल्या जात नाही. शेवटी घोडे कुठे पेंड खाते ? माशी कुठे शिंकते ? असे नाईलाजाने म्हणावे लागत आहे. हा प्रश्न नक्की कधी मार्गी लागणार ? नियुक्त्या कधी मिळून आम्ही शाळांवर रुजू होणार ? याची आतुरतेने, तळमळीने तमाम निदेशक, शिक्षक बांधव वाट पाहत आहे. का तर कोरोनाजन्य परिसिथतीत मागील दोन ते तीन वर्षात जनते बरोबर कला, क्रीडा. कार्यानुभव निदेशक, शिक्षक पिळवटून, होरपळून निघाला आहे. त्या कालावधीत अनेक कला, क्रीडा, कार्यानुभव, निदेशकांच्या कुटूंबात एखाद्या व्यक्तीला, लहान मुला-मुलीला कोरोनाची लागण झाली होती. त्यातून तो सावरल्या गेला आहे. परंतु दवाखान्यासाठी, निवारण करण्यासाठी झालेला खर्च त्याने व्याजाने, कर्जाने, आणला होता. आता त्याची परतपेड कशी करायची या धास्तीने तो खचून गेला, पिचून गेला. त्याच्या कुटूंबीयांची उपासमारी होत आहे.

करिता सध्याच्या राज्य सरकारने मा. मुख्यमंत्री, शिक्षणमंत्र्यांनी हा ज्वलंत प्रश्न त्वरीत लवकरात लवकर मार्गी लावावा, नाही तर परिस्थिती हाताबाहेर जाते की काय अशी परिस्थिती निर्माण होण्याच्या मार्गावर आहे. २०१३ ला नांदेडला एका कार्यानुभव निदेशकाने स्वतःचे जीवन संपविले होते. त्या घटनेची पुनरावृत्ती वाढणार नाही ना अशी साभार भिती वाढत आहे. का तर नुकतेच चार पाच दिवसापूर्वी विदर्भातील वाशिम, अकोला स्थित असणाNया तीन ते चार निदेशकांची वार्ता माझ्यापर्यंत आली. नोकरी नाही, नियुक्ताा मिळत नाही, इतर काम धंदा मिळत नाही. परिणामी घरातील दररोजची उपासमारी या धास्तीला वंटाळून या चौघांनी सामुहिक आत्महत्या करु असे बोलून दाखवले. हे वृत्त माझ्या पर्यंत आले. निदेशक बाधवांनी डोक्यातून काढून टाकावे. सांगायचे तात्पर्य आता अशा आत्महत्येच्या घटना वाढू नयेत. हे सर्व टाळण्यासाठी राज्य सरकारने लवकरात लवकर कला, क्रीडा, कार्यानुभव निदेशक शिक्षक बांधव भगिनींचा हा प्रश्न मार्गी लावावा. म्हणूनच आता दिवाळी सणही जवळ येत आहे. कोणत्याही परिस्थितीत मा. मुख्यमंत्री साहेबांनी व मा. शिक्षण मंत्र्यांनी गेल्या १० वर्षापासून प्रलंबीत असणारा प्रश्न मार्गी लावून तमाम अतिथी निदेशक शिक्षक बांधवांची दिवाळी गोड करावी हीच अपेक्षा.

मल्हारराव डोणगांवकर
संपर्क क्र. 9637937579

# कर्माचा हिशेब

आधुनिक केसरी

**अपघातात गंभीर जखमी झालेल्या एका व्यक्तीला, रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णाची प्रकृती अत्यंत गंभीर होती. रुग्णालयाचे मालक असलेल्या डॉक्टरांनी त्या व्यक्तीला पाहिल्यानंतर, लगेचच ते स्वत: आय.सी.यू. मध्ये त्या रुग्णाची तपासणी करण्यासाठी गेले. दोन-तीन तासांच्या ऑपरेशननंतर डॉक्टर बाहेर आले आणि त्यांनी कर्मचाऱ्यांना सांगितले की, “या रुग्णाला कोणत्याही प्रकारची कमतरता किंवा कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची व्यवस्थित काळजी घ्यावी.” तसेच त्याच्याकडून उपचाराचे व औषधाचे सुद्धा पैसे घेऊ नयेत, अशा ही सूचना त्यांनी दिल्या.**

सुमारे 15 दिवस तो रुग्ण त्या हॉस्पिटलमध्ये होता. जेव्हां तो बरा झाला आणि त्याला हॉस्पिटलमधून सोडण्याचा दिवस आला, तेव्हां त्या पेशंटचे सर्व रिपोर्ट्स व सुमारे अडीच लाख रुपयांचे बिल त्या डॉक्टरांना देण्यात आले जे त्या हॉस्पिटलचे मालक होते. डॉक्टरांनी हिशोब ठेवणाऱ्या साहेबांना बोलावून सांगितलं.. या व्यक्तीकडून एक ही पैसा घेऊ नका. आणि असं करा, तुम्ही त्या रुग्णाला माझ्या खोलीत घेऊन या. त्या माणसाला व्हील चेयरवर डॉक्टरांच्या खोलीत नेण्यात आले.

डॉक्टरांनी पेशंटला विचारले- भाऊ! आपण मला ओळखलंत का? पेशंट म्हणाला, “मला असं वाटतं मी तुम्हाला कुठेतरी पाहिलंय. पण आठवत नाही! डॉक्टर म्हणाले... तुम्हाला आठवतं का, की चार वर्षांपूर्वी तुम्ही सूर्यास्ताच्या सुमारास, शहरापासून दूर अशा एका जंगलात एक गाडी दुरुस्त केली होतीत? त्या दिवशी मी माझ्या कुटुंबासोबत सहली वरुन परतत असताना, अचानकपणे गाडीतून धूर येऊ लागला आणि गाडी बंद पडली. आम्ही गाडी बाजूला घेवून, ती सुरू करण्याचा प्रयत्न केला, पण गाडी सुरू झाली नाही. हळू हळू अंधार होऊ लागला होता. आजूबाजूला निर्जन जंगल होते. कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या चेहर्यावर भिती आणि काळजीच्या रेषा उमटल्या होत्या. प्रत्येकजण देवाकडे, काहीतरी मदत मिळावी, यासाठी प्रार्थना करत होते.

काही वेळातच चमत्कार घडला. तुम्ही बाईकवरून येताना आम्हांला दिसलात. आम्ही सर्वांनी, दयेच्या भावनेने हात वर केले आणि तुम्हाला थांबण्याचा इशारा केला. तुम्ही बाईक उभी केलीत व आमच्या त्रासाचे कारण विचारलेत. गाडीचे बोनेट उघडून तुम्ही काही तपासणी केलीत आणि काही क्षणातच गाडी सुरू झाली. आमच्या सर्वांचा जीव भांड्यात पडला आणि आमच्या चेहऱ्यावर आनंदाची लाट पसरली. आम्हाला वाटले, की देवानीच तुम्हाला आमच्या मदतीसाठी पाठविले असावे, कारण त्या निर्जन जंगलात रात्र घालवावी लागणार, ह्या विचारानेच आमच्या अंगावर भितीने शहारे येत होते. तेव्हा तुम्ही मला सांगितले होते, की तुम्ही एक गॅरेज चालवता. मी तुमचे आभार मानले आणि म्हणालो, की पैसे असूनही अशा कठीण प्रसंगी मदत मिळत नाही. अशा कठीण परिस्थितीत तुम्ही आम्हाला केलेल्या मदतीला तोड नाही, ती अमूल्य आहे. पण तरीही मी तुम्हाला विचारतो की मी तुम्हाला किती पैसे देऊ? त्यावेळी तुम्ही माझ्यासमोर हात जोडून जे शब्द उच्चारलेत, ते शब्द माझ्या आयुष्याची प्रेरणा बनले आहेत. तुम्ही म्हणालात की, “माझा नियम आणि तत्व हे आहे, की मी संकटात सापडलेल्या व्यक्तीच्या मदतीच्या बदल्यात कधीही काहीही घेत नाही. माझा देव माझ्या ह्या कर्मांचा हिशोब ठेवत आहे.” त्या दिवशी मला जाणवले, की आर्थिक परिस्थिती सामान्य असलेली व्यक्ती, जर असे उच्च विचार आणि अशा मूल्यांचे दृढनिश्चयाने अनुसरण करू शकते, तर मी का नाही? आणि ह्याच संकल्पाचा मी ही माझ्या आयुष्यात पाठपुरावा करत आहे. चार वर्ष झाली आहेत, माझ्या अपेक्षेपेक्षाही मला जास्त मिळत आहे आणि कधीच काहीही कमी पडलेले नाही. हे रुग्णालय माझे आहे. तुम्ही येथे माझे पाहुणे आहात आणि तुमच्या नियमानुसार मी तुमच्याकडून काहीही घेऊ शकत नाही. अशा प्रेरणादायी व्यक्तीची सेवा करण्याची संधी मला मिळाली, ही देवाचीच कृपा आहे. तुमच्या देवाने तुमच्या चांगल्या कर्मांचा हिशोब ठेवला आणि आज तो हिशेब चुकता झाला. माझा देव ही माझ्या कर्मांचा हिशोब ठेवेल आणि जेव्हा जेव्हा मला त्याची आवश्यकता असेल, तेव्हा त्याची परतफेड त्यातूनच होईल. डॉक्टर त्या रुग्णाला म्हणाले. तुम्ही निर्धास्त मनाने घरी जा आणि जेव्हा कधी अडचण आली, तर तेव्हा तुम्ही संकोच न बाळगता माझ्याकडे येऊ शकता. त्या खोलीमधून बाहेर पडताना, त्या व्यक्तीने खोलीत ठेवलेल्या परमेश्वराच्या फोटो समोर हात जोडले आणि त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले व हृदय प्रेमाने भरून आले. आपण केलेली कर्मे आपल्याकडे परत येतात आणि ती ही व्याजासह. हाच सृष्टीचा नियम आहे. फक्त धन दौलत संप्पत्ती कमवल्याने वेळ प्रसंगी कामे येईल हा गैर समज आहे. कर्म चांगले असले की ते वेळ प्रसंगी कामी येतात. सगळीच कामे शक्तीने होत नाही. काही ठिकाणी सहनशक्ती ही वापरावी लागते.

# संत जनाबाई

आधुनिक केसरी




शेकडो वर्षे महाराष्ट्राच्या मुखात दोन संतांचे अंभंग खडीसाखरेप्रमाणे घोळतायत आणि ते म्हणजे संत तुकोबाराय आणि संत जनाबाईंचे गोड अभंग. पंढरीची सावळी विठाई म्हणजे दीनदुबळ्यांची आई. सुखदुःख जाणून घेणारी माऊली. अनाथ जनी असा या विठाईच्या नावाने टाहो फोडते. या विठाईची वाट पाहून जनाई व्याकूळ होते. पांडुरंगाच्या देवळासमोरच झोपडीत राहणाऱ्या गरीब जनाबाईने देवाच्या गळ्यातले पदक चोरले, असा आरोप तिच्यावर होतो. मग आपण सोन्यानाण्याची नव्हे तर विठुरायाची चोरी केली आणि त्याला हृदयात बंदिस्त केल्याचे ‘**धरिला पंढरीचा चोर**’ या अभंगातून ती सांगते. ‘***माझे अचडे बचडे छकुडे गं राधे रुपडे***’ सारखे तिचे श्री विठ्ठलाच्या बाळरुपाचे वात्सल्याने ओतप्रोत भरलेले अभंग तर अप्रतिम ठरलेत. जनीची भक्ती म्हणजे रोजचं काम करता करता देवाचं नाव घेणं. ‘***दळीता कांडिता तुज गाईन अनंता***’ हे तिचं तत्वज्ञान खेडोपाड्यातील अडाणी माणसांनाही आपले वाटते आहे. जनीने दाखवलेला‘लेकुरवाळा विठूराया’संसारात रमलेल्या, मुलेबाळं सांभाळणाऱ्या आयाबायांना नेहमीच भावलेला आहे.‘***नाम विठोबाचे घ्यावे मग पाऊल टाकावे***’ हा जनाबाईचा अभंग गात वारकरी पंढरीची वाट चालतात. परभणी जिल्ह्यातील गोदावरीच्या तीरावरील गंगाखेड हे जनाबाईंचे गाव होय. तिच्या वडिलांनी जनाबाईला नामदेवांचे वडील दामाशेट शिंपी यांच्याकडे नोकरीसाठी पाठवले. तेव्हापासून त्या संत नामदेव यांच्या कुटुंबीयांतील एक घटक बनल्या. त्या स्वतःला नामयाची दासी म्हणवून घेत असत. जनाबाईंचा जन्म परभणी येथील गंगाखेड येथील दमा नावाच्या विठ्ठलभक्ताच्या घरी झाला. जनाबाईंच्या एका अभंगातील “***माझ्या वडिलांचे दैवत| तो हा पंढरीनाथ ||***” या ओळींवरून त्यांचे वडील दमा हेदेखील वारकरीअसावेत, अशी शक्यता दिसते. त्यांच्या आईचे नाव करुंड. त्याही भगवद्‌भक्त होत्या. संत जनाबाई या संत कवयित्री म्हणून जनमानसात लोकप्रिय आहेत. महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातून स्त्रिया जात्यावर दळण दळताना, कांडताना त्यांच्या ओव्या गातात. अतिशय सामान्यातली सामान्य, अशी जनाबाईची ओळख. पण आयुष्यभर मोलकरणीचे काम करणाऱ्या या दासीने एक असामान्य काम केले. ते म्हणजे, तिने काळजाचा ठाव घेणारे अभंग लिहिले आणि मराठवाड्यातल्या गंगाखेडची जनी संत जनाबाई बनली. तत्कालीन खालच्या सामाजिक स्तरातून वर उठून स्वतःचे असे वेगळे अस्तित्व निर्माण करणाऱ्या ***क्रमशः***

# उत्सव बळीराजाच्या पुनरागमनाचा

आधुनिक केसरी

**आम्ही वाट पाहत आहोत ,बळीराजाच्या पुनरागमनाची. हजारो वर्षापासून आम्ही त्याला स्मरणात ठेवले आहे. तो हिरण्यकशिपुचा पणतू, प्रल्हादाचा नातू, विरोचनाचा पुत्र, कपिलाचा पुतण्या, बाणासुराचा पिता आणि उषेचा आज्जोबा. भारताच्या सांस्कृतिक इतिहासातील एक अत्यंत उत्तुंग व्यक्तिमत्व. सुमारे साडेतीन ते पाच हजार वर्षा पूर्वी होऊन गेलेला एक महानायक, महासम्राट, एक महान तत्ववेत्ता.**

***पुण्यवंत पाताळ लोकीं नेला । दरिद्री तो भाग्यवंत केला । चोरटयाचा बहुमान वाढविला ।कीर्तिवानाचा अपमान केला ॥१॥ धुंद झाला तुझा दरबार ॥धृ०॥ - संत जनाबाई***

हजारो वर्षापासून आमच्या माय-माऊल्या दसरा दिवाळीला तुझ्या आगमनाचा उत्सव साजरा करतात बळीराजा. त्या मोठ्या आनंदाने तुझा राज्य येऊ दे म्हणतात. आज भलेही वामनाचे राज्य असो,आम्ही मात्र तुझ्याच पुनरागमनाची वर्षानुवर्षे आस लावून बसलेलो आहोत. आता आम्हाला हवा आहे, वामनाला पाताळात घालणारा बळीराजा. पुन्हा एकदा शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे , सर्वहारांचे अभेद राज्य उभं करणारा महासम्राट बळीराजा.शेतातील नांगराचा सोन्याचा फाळ आणि अंगणातील सोन्याचे रांजण एवढा वैभवसंपन्न शेतकऱ्यांचा राजा आम्हाला पुन्हा हवा आहे.

दैन्य दुख दारिद्र्य दुर करणारा समतेचे राज्य उभे करनारा बळीराजा आम्हाला हवा आहे. म्हणूनच आम्ही त्याची पुन्हा पुन्हा वाट पाहतो आहोत, नक्कीच तो एक दिवस येईल एक नवा क्रांतिकारक बनवून.... नवा नायक बनून...

सुखासमाधाणाने नांदनाऱ्या बळीराज्यात एकदा वामन नावाची पिडा आली आणि कपटाने यज्ञाच्या खांबाला बांधुन आमचा बळीराजा संपवला गेला.

राजामारल्यावर त्याचे मुंडके लाथेने उडवले गेले. यज्ञदेवतेला रक्ताचा नैव्यद्य दाखवण्यात आला.नरमेध यज्ञ म्हणुन ते रक्त वैदिक पित होते.काय ही दशा केली गेली आमच्या पुर्वजांची.

आम्ही आसुर कुळाचे वारसदार बळीचे वंशज वामनाची वैदिक संस्कृती कधीच माननार नाहीत. आमच्या धमण्यान्मधे बळीराच्या आसुर कुळाचे रक्त वाहात



आसेल तर ते आम्ही कसे नाकारायचे.

होय आम्ही आसुर आहोत.आसुर सम्राट हिरण्यकश्यपचा पनतु ,प्रल्हादाचा नातु ,विरोचणचा पुत्र ,कपिल यांचा पुतण्या,बाणासुराचे पिता महासम्राट बळीराजा आमचा सख्खा पुर्वज होता.

***आम्ही आमच्याच पुर्वजांचा गौरव करणार .***
***आम्ही बळीराजाचाच गौरव करणार...***
***वदनी कवळ घेता | नाम घ्या बळीराजाचे||***
***सहज स्मरण करा |आपल्या कुळस्वामीचे||***
***कृषीक्षेत्रात राबती | मायबाप दिनरात ||***
***करतात श्रमकरी शेतकरी |अन्नधान्याची भरभराट ||***
***करून स्मरण तयांचे | करावे अन्न सेवन ||***
***उदरभरण आहे | संपन्न होवो जीवन ||***

रास्ट्रपिता जोतिराव फुले साहेब बळीराजाची बाजू घेताना म्हनतात .

***आमुच्या देशीचे अतुल स्वामी वीर ||***
***होते रणधीर || मरुत्यास ||***
***बळीस्थानी आले शूर भैरोबा ||***
***खंडोबा, जोतिबा || महासुभा ||१||***
***सद् गुणी पुतळा राजा मुळ बळी ||***
***दशहरा, दिवाळी ||आठविती ||२||***
***क्षत्रिय भार्या इडा पीडा जाओ ||***
***बळी राज्य येवो ||अशा का बा ?||३||***
***आर्य भट आले, सुवर्ण लुटिले ||***
***क्षत्री दास केले || बापमत्ता ||४||***
***वामन का घाली बळी रसातळी ||***
***प्रश्न जोतीमाळी ||करी भटा ||५||***

-रास्ट्रपिता जोतीराव फुले.

जगतगुरु तुकोबाराय सुद्धा बळीराजाची बाजु घेताना म्हणतात..

***हरि तु निष्ठुर ,निर्गुण !***
***नाही माया बहु कठिण !!***
***नव्हे ते करिशी आण !***
***कवणे नाही केले ते !!***
***बळी सर्वस्वे उदार !***
***जेणे उभारिला कर !!***
***करोनी कहर !!***
***तु पाताळी घातिला !!***

जय बळिराजा ...

आपल्याही गावी, शहरात, वाड्यावर, वस्तीवर, तांड्यावर ग्रामपंचायत कार्यालयात, ओट्यावर , चौकात ऑफिसात किंवा घरात चौरंगावर बळीराजाची प्रतिमा ठेवून पुजन करावे. विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे. वारकऱ्यांना घेऊन टाळ मृदंगाच्या गजरात पालखी सोहळा काढावा किंवा बैलगाडीने मिरवून काढावी.

ह.भ.प. धर्मकीर्ती महाराज
संपर्क क्र. 9970744142

# परतीच्या पावसाने पिकाचे नुकसान

## पंचनामे करून शासनाने मदत देण्याची कन्नड तालुक्यात शेतकऱ्यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**गोरख पाटील**

**कन्नड :** तालुक्यातील नाचनवेल भिलदरी परिसरात सततच्या पावसामुळे तसेच परतीच्या पावसाने शेतकऱ्यांच्या शेतातल्या पिकाचे खूप नुकसान झाले आहे. परतीच्या पावसाने सर्वत्र अहंकार सुरु केला आहे. पावसामुळे पिके पाण्याखाली आल्याने अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्यामुळे बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांनी पेरणीसाठी इकडून तिकडून पैशे जमा करुन लागवड केली. आता शेतीमाल हातात आल्यागत असताना पून्हा पावसाने शेतकऱ्यांचे पिंके कापूस, मका, सोयाबीन, तूर, अद्रक आदी पिके पूर्णपणे पाण्याखाली गेल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकरी राजाचे दिवाळीत दिवाळे निघाले आहे. या हवालदील झालेल्या शेतकऱ्याला शासनाने मदतरूपी हातभार लावून उभारी द्यावी त्यासाठी तत्काळ सरसकट पंचनामे करून मदत द्यावी अशी मागणी विजय वैष्णव, सचिन सिंगल, जमील शहा, कल्याण वैष्णव, चंपालाल राजपूत, भगवान राजपूत, नेपाल सिंगल, कपूर महेर, हनुमान वैष्णव, दिलीप राजपूत, किरण राजपूत, गोकूळ राजपूत, मदन राजपूत, शिकंदर शहा, अकबर शहा, काकासाहेब चौतमाल, एकनाथ चौतमाल, जितेंद्र वैष्णव सह शेतकऱ्यांनी केली आहे.





# पुरस्कारामुळे जबाबदारीत वाढ : संजय कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पनवेल येथील आद्य क्रांतिगुरू वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात रविवार, 16 ऑक्टोबर रोजी 'स्टार महाराष्ट्राचे' हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन एमसीएम टीव्ही आणि साईसागर एंटरटेन्मेंट नवी मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक जनार्दन शिंदे यांनी केले होते. यावेळी शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या राज्यभरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज भोसले हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून पुणे स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कोलते, यशकल्याणी संस्थेचे गणेश भाऊ करे पाटील, ज्येष्ठ पत्रकार बालकिशन सोनी, महाराष्ट्र टुडेचे मुख्य संपादक विलास इंगळे, भास्करविश्व मीडियाचे मुख्य संपादक सुधीर जगदाळे, दै. दिव्य मराठीचे वरिष्ठ उपसंपादक संतोष भांडवले यांची उपस्थिती होती. राज्यातील विविध क्षेत्रात सर्वस्व झोकून देऊन काम करणारे अनेक आहेत, अशा व्यक्तींची निवड करून त्यांच्या कार्याचा गौरव करणे खरे तर हे काम अवघड आहे. मात्र, जनार्दन शिंदे हे काम नेटाने करत आहेत. अशा कार्यक्रमामुळे गौरव झालेल्यांची जबाबदारी वाढते व त्यांना अशी समाजोपयोगी कामे करण्याचा हुरूप येतो, असे गौरवोद्गार पुणे स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कोलते यांनी काढले. तर अशा पुरस्कार सोहळ्याने कामाचा उत्साह वाढतो आणि प्रेरणा मिळते त्यामुळे असे कार्यक्रम महत्त्वाचे ठरतात, असे याप्रसंगी मेघराज भोसले यांनी अध्यक्षीय समारोप करताना सांगितले. यावेळी यशकल्याणी संस्थेचे गणेश करे पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी मुकेश उपाध्ये, शाहीर सुरेश जाधव, शाहीर देवानंद माळी, भारूडकार शेखर भाकरे यांचा मनोरंजनपर कार्यक्रम सादर करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कॅमेरामन संस्कार व राजेश गोकलानी, फोटोग्राफर अजय कस्तुरे, साई व सागर शिंदे, सौ. प्रतिमा शिंदे, अमोल त्रिभुवन, विष्णू वाघमोडे, पूजा केदारे, दीक्षा खरात, साईनाथ जाधव यांनी पुढाकार घेतला. अच्युत भोसले यांनी आभार मानले.

**यांचा झाला गौरव:** संजय कोलते, मेघराज भोसले, गणेश करे पाटील, ज्येष्ठ पत्रकार बालकिशन सोनी, विलास इंगळे, सुधीर जगदाळे, संतोष भांडवले, सुरेश चित्ते, अजय मुंडे, अशोक येरेकर, जयंत भोसेकर, नामदेव गंभीरे, किरण आंबेकर, कास्मील बारदेशकर, चंद्रशेखर केकान, शिल्पा चौधरी, डॉ. डी. पी. नाईकवाडे, मनोज बागडे, लक्ष्मण खुरकुटे, लक्ष्मीकांत माळवतकर, सुरेश त्रिमुखे आदी मान्यवरांचा गौरव करण्यात आला.

# फुले विद्यालयात कार्यशिक्षण वस्तू प्रदर्शनी



आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात कार्य शिक्षण वस्तू प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. प्रदर्शनीचे उद्घाटन मुख्याध्यापिका व्ही. व्ही. घोंगडे यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू तयार केल्या. पर्यावरण पूरक आकाश कंदील, मातीचे किल्ले, त्यापासून विविध वस्तू प्रदर्शनीत मांडण्यात आल्या होत्या. प्रदर्शनीत श्रावणी लोहार या विद्यार्थिनीचा प्रथम क्रमांक आला. ममता सोनवणे व मोहिनी सोनवणे यांचा द्वितीय तर अक्षय जाधव याने तृतीय क्रमांक प्राप्त केला. ईशा पाटील, वृषभ चौधरी, मोक्षा कोळी यांनी उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केला . त्यांना शिक्षक शंकर भामेरे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी एम. एच. बारी, ए. ए. पाटील यांच्यासह सर्व शिक्षक उपस्थित होते.

# बुद्ध कैसे तो सिर्फ बुद्ध जैसे: प्रा. डॉ. संजय गायकवाड

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** सबंध विश्वात अनेक महामानव तथा अलौकिक कार्य करणारे लोकोत्तर महापुरुष होऊन गेलेत. तथागत भगवान गौतम बुद्ध हे या मांदियाळीचे शिरोमणी शोभतात. बुद्ध हे अलौकिक आहे. केवळ भारतीय इतिहासातच नव्हे तर जगाच्या इतिहासात बुद्धांच्या या अलौकिकतेला तोड नाही. आज सगळीकडेच युद्धाचा सुळसुळाट सुरू झालेल्या असताना युद्ध सोडून शांततेचा मार्ग पत्करणारे बुद्ध त्यामुळेच आजही मानवी मनाला अगदी जवळचे वाटतात. बुद्धांची तुलना ही कुणाशीही होऊ शकत नाही म्हणूनच बुद्ध कैसे तो सिर्फ बुद्ध जैसे, असे प्रतिपादन लेखक तथा व्याख्याते प्रा. डॉ. संजय गायकवाड यांनी केले. नावडी, (ता. कन्नड) येथे जंबुद्वीप बुद्ध विहारात आयोजित वर्षावास समाप्तीच्या निमित्ताने तथागत भगवान गौतम बुद्ध आणि आजचा समाज या विषयावर ते बोलत होते. गौतम बुद्ध, संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम, संत नामदेव, जिजाई, भिमाई, रमाई, अहिल्याबाई, फातिमा शेख आदींच्या उदाहरणातून त्यांनी आजचा समाज आणि तथागत गौतम बुद्धांची शिकवण हा प्रवास रेखाटला. गौतम बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथाचे पठण या निमित्ताने करण्यात आले. तद्वतच त्रिशरण आणि पंचशील पठण सुद्धा झाले. याप्रसंगी नंदिनी शिरसाठ यांचा भीम गीताचा कार्यक्रम संपन्न झाला. किशोर वाळुंजे, भाऊसाहेब थोरात, आदिनाथ दाभाडे, संदीप सातदिवे, अशोक महाले, चित्रकार गणेश मोकासे, प्राचार्य कांबळे, विलास सातदीवे, मनवर, उत्तम बाविस्कर, आदींसह मान्यवरांची उपस्थिती होती.

# ठाणा येथे २०० ग्रामस्थांना दूषित पाण्यामुळे अतिसाराची लागण



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील ठाणा येथील गावात एकूण २०० नागरिकांना अतिसाराची लागण झाली आहे. त्यामुळे येथील नागरिक हैराण झाले असून याची माहिती मिळताच आरोग्य पथक झोपेतून जागे झाले. तात्काळ आरोग्य विभागाच्या पथकाने गावात दाखल होऊन उपचार सुरु केले.तर काही रुग्ण औरंगाबाद बाहेरगावी पाठविण्यात आले. तर काही रुग्ण खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहे.तसेच ग्रामीण पाणीपुरवठा योजनेतून येथे बांधलेल्या २५ हजार लिटर पाण्याच्या टाकीचे झाकण ही लावलेले नसल्याने त्यात घाण पडते. त्यामुळे दूषित पाणी पिण्यात आल्यामुळे दोन दिवसांपासून नागरिकांना अतिसाराचा त्रास होत असल्याचे येथील नागरिकाचे म्हणणे आहे आरोग्य विभागाचे पथक गावात दाखल झाले असून रुग्णावर उपचार सुरू आहेत डॉ. श्रीनिवास सोनवणे,डॉ. महेश जाधव, डॉ. प्रियदर्शिनी पवार,आरोग्य सहाय्यक ए. एस. जोहरे, आरोग्य सेवक अमोल धमके, गोपीचंद राठोड, वसंत राठोड,अनिल महाजन, संतोष सोहनी, रमेश कदम याचे पथक रुग्णावर उपचार करत आहेत या घटनेमुळे ग्रामसेवक व्ही. एच. वडीले यांनीही पिण्याच्या पाण्याची टाकी स्वच्छ करून घेतली दरम्यान वॉटर फिल्टर प्लॉट तातडीने सुरू करून गावाला सुद्धा पाणीपुरवठा करावा अशी मागणी यावेळी नागरिकांनी केली. ठाणा येथे ग्रामपंचायतीने चौदाव्या वित आयोगातून पाच वर्षापासून सुद्धा पाणीपुरवठ्यासाठी येथे वॉटर फिल्टर बसवलेले आहे. मात्र या प्लॉटवर बसवलेल्या मशिनरी धूळ खात पडून हा मशिनरी वर लक्ष द्यावे.अशी माहिती उपसंपादक प्रविण तायडे यांनी बोलताना सांगितले.

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# ओला दुष्काळ जाहीर करून पीकविमा सरसकट द्या

## राष्ट्रवादी काँग्रेस व शेतकऱ्याच्या वतीने उपजिल्हाधिकारी कार्यालय अंबाजोगाई यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** निसर्गाकडून वारंवार शेतकऱ्यावर होणाऱ्या अपदा (संकट) कधी संपणार सुरुवातीला कमी पाऊस त्यावर दुबार पेरणीचे संकट कसे तरी दुबार पेरणी केली कापूस सोयाबीन उगवतो न उगवतो त्यावर गोगलगायी या रोगाचा प्रादुर्भाव सोयाबीन चे हाता तोंडाला आलेले पीक परतीच्या पावसाने शेतांत पाण्यात बुडाले ही शेतकऱ्यांची अवस्था प्रत्येक माध्यमाने आपापल्या पत्रकात छापून सरकार परियंत पोहोचविण्याचे काम केले. काल दि.18 सोमवार रोजी बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस व शेतकऱ्याच्या वतीने निवेदन उपजिल्हाधिकारी कार्यालय अंबाजोगाई येथे देण्यात आले. त्यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी व राष्ट्रवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, माजी आमदार पृथ्वीराज साठे, संजय दौंड, माजी नगराध्यक्ष राजकिशोर, मोदी पंचायत समिती चे तानाजी देशमुख, बाळासाहेब सोनवणे,आदमाने, जगताप् डॉक्टरसेल चे राजेश इंगोले सर्वांनी सह्या करून पंचनामे न करता सरसकट शेतकऱ्यांना मदत मिळावी असे निवेदन उपजिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले.



# चिराग पासवान यांच्याकडून लोजपा धुळे जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांचे तोंडभरून कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** लोक जनशक्ती पार्टी उत्तर महाराष्ट्र विभाग धुळे जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांचे जनहिताच्या कामासंदर्भात कौतुक करत लोक जनशक्ती चे राष्ट्रीय अध्यक्ष चिराग पासवान यांनी उत्तर महाराष्ट्राचे अध्यक्ष दिलीप आप्पा साळवे, महिला अध्यक्षा शोभाताई चव्हाण, महासचिव कुंदन खरात यांच्यासह पदाधिकाऱ्यांना शाब्बासकीची थाप देऊन त्यांचे तोंडभरून कौतुक केले आहे. लोक जनशक्ती पक्ष (रामविलास) राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये पार पडली. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष चिराग पासवान यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पक्षाचे संस्थापक पद्मभूषण स्व. रामविलास पासवान यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन दीपप्रज्वलन केले. राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीच्या सुरुवातीला अध्यक्ष चिराग पासवान यांनी सभागृहात उपस्थित कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांना पक्षाची शपथ दिली. यावेळी कार्यक्रमाला संबोधित करताना चिराग यांनी संघटनेच्या महत्त्वाच्या विषयावर भर देत कोणत्याही पक्षाचा कणा हा तिची संघटना असतो, संघटना मजबूत असेल तर आमदार किंवा खासदार बनत असतात त्यामुळे मी संघटनेच्या बळावर सातत्य ठेवतो. संघटना पक्षाच्या विस्ताराबाबत चर्चा करताना ते म्हणाले की, पक्षाची सीमा ही केवळ बिहारची नाही तर संपूर्ण देशाची आहे, त्यामुळे मी स्वतः सातत्य ठेवले आहे. सातत्याने सर्व राज्यांच्या दौऱ्यावर असतो, निवडणुकीची चर्चा करताना त्यांनी गुजरात आणि हिमाचल प्रदेशमध्ये होऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये पक्षाला मैदानात उतरवण्याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यकारणी बैठकीला विविध राज्यांमधील लोक जनशक्ती पार्टीचे पदाधिकारी उपस्थित होते. उत्तर महाराष्ट्र विभाग धुळे जिल्ह्यातून उत्तर महाराष्ट्र विभाग अध्यक्ष दिलीप आप्पा साळवे, महिला जिल्हाध्यक्षा शोभाताई चव्हाण, महासचिव कुंदन खरात, मधुकर चव्हाण, सुरज साळवे, सागर चव्हाण, यांसह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी उत्तर महाराष्ट्र विभाग व धुळे जिल्ह्यात केलेल्या जनहिताच्या कामासंदर्भात राष्ट्रीय अध्यक्ष चिराग पासवान यांनी अहवाल पाहुन पदाधिकाऱ्यांचे तोंडभरून कौतुक केले तर एवढेच नाही तर पदाधिकाऱ्यांना शाबासकीची थापही दिली. उत्तर महाराष्ट्र विभागातील येणाऱ्या अडचणी व समस्या सोडवण्यासाठी नेहमी कटिबद्ध असल्याचं आश्वासनही चिराग पासवान यांनी पदाधिकाऱ्यांना दिले. स्व. रामविलास पासवान ज्याप्रमाणे पदाधिकाऱ्यांना समजून घेत होते कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांवर प्रेम करत होते त्याच प्रमाणे चिराग पासवान यांच्याकडूनही मिळालेले प्रेम आपुलकी पाहून उत्तर महाराष्ट्र विभागाचे पदाधिकारी भारावून गेले होते त्यांचे अश्रू ही अनावर झाले होते.



# पशुसंवर्धन अधिकाऱ्यांना बडतर्फ करून कारवाईची ठेलारी महासंघाची मागणी




आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी राजेंद्र लंगे यांच्या कारवाई संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, धुळे यांना निवेदन देवुन आज ८ दिवस उलटुनही कुठलीही कार्यवाही न झाल्याने मेंढपाळ ठेलारी समाज अध्यक्ष शिवदास वाघमोडे दि २७ रोजी ११.०० वाजता जिल्हा परिषद, धुळे कार्यालयासमोर अंगावर रॉकेल टाकुन आत्मदहन करेल त्या आंदोलनात माझ्या जिवाचे बरे वाईट झाल्यास आदोलनास कारणीभूत ठरलेल्या अधिकाऱ्यांना जबाबदार असणाऱ्या धुळे जिल्हा पशुसर्वधन अधिकारी राजेंद्र लंघे यांना बडतर्फे करुन कठोरातील कठोर कार्यवाही व्हावी अशी समस्त मेंढपाळ ठेलारी समाजाची मागणी आहे. तरी मेंढपाळ ठेलारी समाजास वेळोवेळी घालून पाडुन बोलणे व समाजावरुन खालच्या स्तरावर भाषा वापरणे असे सतत घडत आलेले आहे . परंतु मेंढपाळ ठेलारी समाज अशिक्षित असल्याने आजपर्यंत त्यांना कोणी काहीही उत्तर दिले नाही. परंतु मी मेंढपाळ ठेलारी समाज अध्यक्ष या नात्याने मेंढपाळ ठेलारी समाजाने माझेकडे तक्रार केल्यानंतर मी स्वतः व १० ते १२ मेंढपाळ ठेलारी बांधव पी.पी.आर लसची मागणी करण्यासाठी गेले असता, त्यांना व त्यांचे मेंढपाळ ठेलारी बांधवांना माझ्या समोर आरेरावी करून ठेलारी समाजास वेळोवेळी घालून पाडुन बोलणे व समाजावरुन खालच्या स्तरावर भाषा वापरली. त्याचा जाब मी विचारला असता, मला समोरील अधिकाऱ्याने उत्तर दिले की, जास्त बोलू नकोस नाही तर, तुझ्यावर सरकारी कामात अडथळा म्हणून गुन्हा दाखल करेल, अशी धमकी देवुन कुठलेही उत्तर न देता ऑफिसातुन निघुन गेले. त्या अनुषंगाने अशा आरेरावी व ठेलारी समाजास वेळोवेळी घालुन पाडून बोलणे व समाजावरुन खालच्या स्तरावर भाष्य करणाऱ्या अधिकाऱ्यास तत्काळ बडतर्फे करुन योग्य ती कायदेशीर कार्यवाही व्हावी यासाठी मेंढपाळ ठेलारी समाजाने दिनांक १४/१०/२०२२ रोजी मा . मुख्य कार्यकारी अधिकारी सो., जिल्हा परिषद, धुळे यांच्याकडे निवेदन देवुन अशा उर्मट व मग्ररुढ अधिकाऱ्याला बडतर्फे करुन कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी केली होती. अन्यथा कुठलीही कार्यवाही न झाल्यास मी मेंढपाळ ठेलारी समाज अध्यक्ष या नात्याने त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही न झाल्यास जिल्हा परिषद कार्यलय, धुळे समोर अंगावर रॉकेल देवुन आत्मदहन करेल असा इशारा देऊनही आजपावेतो कुठलीही कार्यवाही झालेली नाही. त्या अनुषंगाने दिनांक २७/१०/२०२२ रोजी मी मेंढपाळ ठेलारी समाज अध्यक्ष या नात्याने अंगावर रॉकेल टाकून आत्मदहन आंदोलन करेल असे आवाहन पत्रकार परिषद घेऊन केले.

# विदर्भ साहित्य संघ अध्यक्षपदी प्रदीप दाते

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदी प्रदीप दाते यांची



आज झालेल्या कार्यकारिणीच्या तातडीच्या बैठकीत निवड करण्यात आली. विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुल, सीताबर्डी, नागपूर येथील कार्यालयात वि. सा. संघाच्या कार्यकारिणीची बैठक पार पडली. मनोहर म्हैसाळकर यांचे निधनानंतर वि. सा. संघाचे अध्यक्षपद रिक्त झाले होते. विदर्भ साहित्य संघाचे सरचिटणीस विलास मानेकर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. यात प्रदीप दाते यांच्या नावावर अध्यक्षपदासाठी शिक्कामोर्तब करण्यात आले. प्रदीप दाते हे विद्यमान कार्यकारिणीत शाखा समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. प्रदीप दाते यांना संस्थात्मक कार्याचा दीर्घ अनुभव असून ते गेल्या सुमारे चार दशकांपासून सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात सक्रीय आहेत. यशवंतराव दाते स्म्रती प्रतिष्ठानचे ते अध्यक्ष असून अनेक संघटनांमध्ये विविध पदांवर कार्यरत आहेत. विदर्भ साहित्य संघाशी गेल्या तीन दशकांपासून ते संबंधित असून अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळात ते विदर्भ साहित्य संघाचे प्रतिनिधीत्व करीत आहेत. त्यांच्या नेतृत्वात विदर्भ साहित्य संघाचे कार्य समर्थपणे पुढे जाईल, असा विश्वास कार्यकारिणीतर्फे व्यक्त करण्यात आला.

# मोबाईलवर लुडो खेळताना चौघे पकडले

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ऑनलाईन खेळ खेळून करमणूक केली जाते; परंतु ऑनलाईन पत्ते आणि आता लुडो नावाने खेळावर पैसे लावून जुगार जोमात सुरू आहे. करमणूक म्हणून शहरात विद्यार्थी, नागरिक हा खेळ खेळायचे परंतु आता यावर पैसा लावला जात असून या जुगारात गुंतलेली अनेक टोळकी दिसत आहेत. बुधवारी सकाळी गस्तीवर असताना पोलीस निरिक्षक किशोर पवार यांनी काळी पिवळी टॅक्सीमधे चार जण मोबाईलवर लुडो खेळत असताना पकडले असून चार जन, चार, मोबाईल, जिप ताब्यात घेतली असुन जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# दिवाळीची खरेदी एकाच ठिकाणी द मॅग्नेटच्या शॉपिंग उत्सवात

## दिव्य मराठी, द मॅग्नेटच्या दिवाळी शॉपिंग उत्सवास पहिल्या दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद एसएफएस मैदानावर १५० स्टॉल्स, फूड कोर्ट, गेम झोन, आनंदनगरी




स्थळ : सेंट फ्रांसिस स्कूल ग्राऊंड, जालना रोड, औरंगाबाद

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** दिवाळी म्हणजे आनंदाचा परमोच्च क्षण, नवीन खरेदीचा सण, मागिल काही वर्षे हा सण कोरोनाचे सावट असल्याने साजरा करता आला नाही पण यावर्षी खूप उत्साह आहे व धूमधडाक्यात हा साजरा केल्या जात आहे, दिवाळीच्या पार्श्वभूमीवर दैनिक दिव्य मराठी आणि द मॅग्नेट यांच्यातर्फे एसएफएस मैदानावर भव्य दिवाळी एक्स्पो शॉपिंग उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याचे सहकारमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते सोमवारी या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. या वेळी द मॅग्नेटच्या संचालिका रितू अग्रवाल, संदीप निर्मल, कॉन्सेप्ट ॲडव्हर्टायजर्सचे धवल मेहता, दिव्य मराठीचे युनिट हेड बेंजामिन रॉक आदी मान्यवर उपस्थित होते. गृहोपयोगी व गृहसजावटीच्या या प्रदर्शनात राज्यातील कलाकार, कंपन्यांचे आऊटलेट व स्थानिक नवव्यापारी, महिला कलाकारांचे, उद्योजकांचे १५० स्टॉल्स आहेत. १७ ते २१ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनासाठी वॉटरप्रूफ भव्य स्पेसियस पाच डोमची व्यवस्था करण्यात आली आहे. सोमवारी पहिल्याच दिवशी हजारो ग्राहकांनी या प्रदर्शनास भेट देऊन खरेदीस प्रतिसाद दिला. या प्रदर्शनाला एंट्री मोफत असेल, तसेच मैदानावर खूप मोठी फ्री पार्किंगची व्यवस्था आहे. येथे फूड कोर्ट, लहान मुले- तरुणांसाठी करमणूक, गेम झोन, आनंदनगरीचीही सोय केली आहे. तसेच या प्रदर्शनात दिवाळी गिफ्ट, सजावटीचे व पूजेचे साहित्य, दिवाळी करिता विविध डिझाइनचे दिवे, आकाश कंदील, सोलार सिस्टीम, डोअर्स अँड डेकोर, फराळाच्या स्टॉल्ससह लहान व मोठ्यांचे कपडे, खादी कॉटनचे कपडे, फर्निचर, फ्रेंच डोअर्स व विंडोज, फॅक्टरी आऊटलेट्स, ई-बाईकचे दालन, ज्वेलरी, बेडशीट्स, सर्व प्रकारच्या साड्या आदी साहित्यांची दुकाने आहेत, अशी माहिती संचालिका रितू अग्रवाल व संदीप अग्रवाल निर्मल यांनी दिली. दिवाळीसाठीची संपुर्ण खरेदी इथे एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने ग्राहकांची चांगली सोय झाली आहे हे प्रदर्शंन शुक्रवार पर्यंत सकाळी 10 ते रात्री 10 या वेळात सुरु आहे तरी जास्तीतजास्त लोकानी याचा लाभ घ्यावा असे संयोजकांनी आवाहन केले आहे.




# पोलीस अधीक्षक कलवानिया यांनी केला सपोनि केदार, पो.कॉं. तडवी यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** शहराचे पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार व पो.कॉं. सादिक तडवी यांना औरंगाबाद येथे ट्राफी देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मा विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र यांच्या संकल्पनेतून प्रत्येक पोलीस स्टेशन येथे हरवलेल्या व्यक्तीचा शोध घेणेकरिता एका विशेष अंमलदाराची नेमणूक करण्यात आली आहे. सदर संकल्पनेची अतिशय चोख बजावणी करण्यासाठी मा पोलीस अधीक्षक श्री मनीष कलवनिया यांनी पदभार संभाळल्यापासून प्रत्येक महिन्यात उत्तम कामगिरी करणारे पोलीस अधिकारी / अंमलदार यांना गुन्हे बैठकीत सन्मानित करण्याची सुरवात करण्यात आली आहे. यामध्ये पोलीस स्टेशन सोयगाव कडील मनुष्य मिसिंग सेल चे कामकाज करणारे पो. कॉ. सादिक तडवी सोयगाव पोलीस ठाणे यांनी मागील तीन महिन्यात अतिशय उत्तम कामगिरी करत पोलीस स्टेशन हद्दीतून हरवलेल्या 10 पैकी 10 मनुष्य मिसिंग चा शोध घेऊन औरंगाबाद ग्रामीण जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकाविला. त्याबद्दल दि.१८/१०/२२ रोजी मा पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण व अपर पोलीस अधीक्षक औरंगाबाद ग्रामीण यांनी गुन्हे बैठकीत पोलीस स्टेशन सोयगावचे पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल विनायक केदार व मनुष्य मिसिंग सेलचे पो.कॉं. सादिक तडवी यांना ट्राफी देऊन सन्मानित केले आहे.यामुळे सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात सर्वत्र सोयगाव पोलीस स्टेशनचे व सपोनि अनमोल केदार व पो.कॉं. सादिक तडवी यांचे कौतुक करून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# महाराष्ट्राला मिळणार 'राज्यगीत'

## सुधीर मुनगंटीवारांची मोठी घोषणा!



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्राला लवकरच एक राज्यगीत मिळणार असून सर्वांच्याच तोंडी बसलेलं एक सुप्रसिद्ध गीत यासाठी अंतिम करण्यात आलं आहे. मूळ गीताची लांबी जास्त असल्यामुळे या गीतामधील फक्त पहिली दोन कडवी घेऊन त्याला राज्यगीताचा दर्जा देण्यावर एकमत झाल्याचीही माहिती समोर आली आहे. राज्याचे कॅबिनेट मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यासंदर्भात घोषणा केली आहे. महाराष्ट्राच्या राज्यगीतासाठी 'गर्जा महाराष्ट्र माझा' या गीताची निवड करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. सुधीर मुनगंटीवार यांनी यासंदर्भात महत्त्वाची घोषणा केली असून या गीतामधील दोन कडवी घेतली जाणार असल्याची माहिती त्यांनी माध्यमांना दिली आहे. गर्जा महाराष्ट्र माझा हे उत्साह वाढवणारं गीत आहे. या गीताच्या शब्दांमध्ये एक उर्जा आहे. दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा ही भावना आहे. हे गीत साडेतीन मिनिटे वाजायचे. त्यामुळे आम्ही अनुमती घेऊन एक ते दोन मिनिटांमध्ये यातली दोन कडवी घेऊन त्याला राज्यगीताचा दर्जा देण्याचा विचार केला आहे", असे मुनगंटीवार म्हणाले.




# फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** पहुर येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी - शिक्षकांनी फटाके मुक्त दिवाळी साजरी करण्याची शपथ दि.१८/१०/२२ रोजी घेतली. दरवर्षी इको फ्रेंडली क्लबच्या वतीने शाळेतर्फे फटाके मुक्त दिवाळीचा संकल्प केला जातो. फटाक्यांमुळे वायु प्रदूषण, ध्वनी प्रदूषण तसेच पर्यावरणाची हानी होते, त्यामुळे फटाके न फोडता सर्वांनी फटाके मुक्त दिवाळी साजरी करावी, असे आवाहन इको फ्रेंडली क्लबचे अध्यक्ष शंकर भामेरे यांनी केले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका व्ही.व्ही. घोंगडे यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# राज्यातील विविध प्रश्नांसंबंधी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

## राज्यात ओला दुष्काळ जाहीर करा; शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** यंदा राज्यभरात अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे शेतीचे नुकसान झाले आहे, संपूर्ण खरीप पीकांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच सध्या राज्यात सुरु असणाऱ्या पावसाने रब्बीचा हंगामसुध्दा धोक्यात आला असल्याने राज्यात तातडीने ओला दुष्काळ जाहीर करण्याची आग्रही मागणी करत शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आज केली. त्याचबरोबर राज्यातील इतर प्रश्नांकडेसुध्दा अजित पवार यांनी मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले. मुंबईतील मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. राज्यातील विविध प्रश्नासंबंधी त्यांच्याशी चर्चा केली. विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात जून महिन्यापासून आजअखेर राज्यात सातत्याने पाऊस पडत आहे. या अतिवृष्टी आणि पूरामुळे शेतीचे मोठे नुकसान खरीपाचे संपूर्ण पीक गेले असून रब्बी हंगामातील पेरणी केलेले पिकांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकरी प्रचंड आर्थिक संकटात सापडला आहे. राज्यातील बऱ्याच ठिकाणी पावसाने जमिनी वाहून गेल्या असून घरांचीही मोठ्या प्रमाणावर पडझड झाली आहे. अतिवृष्टीमुळे स्थावर मालमत्तेचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तरी राज्यात तातडीने ओला दुष्काळ जाहीर करावा. तसेच राज्यातील शेतकऱ्यांना अजूनही नुकसान भरपाई मिळालेली नाही तरी एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या निकषाच्या बाहेर जाऊन तातडीने मदत देण्यात यावी.



**अलमट्टी धरणाची उंची वाढविण्याला विरोध करावा**

महाराष्ट्रात कृष्णा नदीला कोयना, पंचगंगा, दुधगंगा व वारणा या उपनद्या मिळतात. महाराष्ट्र-कर्नाटक राज्याच्या हद्दीपासून सुमारे २३५ किलोमीटर अंतरावर कर्नाटक राज्यात कृष्णा नदीवर अलमट्टी धरण बांधण्यात आले आहे. अलमट्टी धरण बांधल्यापासून कृष्णा नदीपात्राच्या पाण्यात मोठ्या प्रमाणावर फुगवटा निर्माण होऊन नदीकाठच्या गावात पाणी घुसते. त्यामुळे नदीकाठची गावे, शेती व गुरे यांचे अतोनात नुकसान होते. कोल्हापूर व सांगली जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती व आजपर्यंतच्या महापूर आणि अतिवृष्टी वेळची स्थिती पाहता अलमट्टी धरणाची उंची वाढविणे संयुक्तीक होणार नाही. तरी महाराष्ट्र शासनाने याविषयी केंद्रशासन व कर्नाटक सरकार यांचेकडे पाठपुरावा करुन अलमट्टी धरणाची उंची वाढविण्याविषयी प्रखर विरोध करावा.

**पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या गावांना तातडीने निधी द्यावा**

पुणे महानगरपालिकेमध्ये मागील ५ वर्षांमध्ये एकुण ३४ गावे समाविष्ट झाली आहेत. या गावामध्ये पायाभुत सुविधांची निर्मिती करण्यासाठी ९ हजार कोटींच्या निधीची मागणी महानगरपालिकेने शासनास केली आहे. महानगरपालिकेत समाविष्ट होऊनही पुरेसा निधी न मिळाल्याने ही गावे पाणी, ड्रेनेज, कचरा, रस्ते, आरोग्य अशा मुलभूत सुविधांपासून वंचित राहिली असून यामुळे या गावांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे. तरी या गावांच्या विकासासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन द्यावा.

**वडगावशेरी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांचा पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावावा**

पुणे जिल्ह्यातील वडगावशेरी विधानसभा मतदारसंघातील सिध्दार्थनगर, नगररोड, पुणे या ठिकाणच्या नागरिकांची घरे २००९ साली कॉमनवेल्थ खेळासाठी रस्ता संपादित करुन नागरिकांना झोपडपट्टी पुनर्वसन तसेच पुणे महानगरपालिका आणि जेएनएनयुआरएम यांनी बाधीत नागरिकांचे पुनर्वसन करण्यात येईल असे आश्वासित केले होते. या घटनेला १३ वर्षे होऊनही बाधीत नागरिकांचे पुनर्वसन झाले नाही तरी त्यांचे तातडीने पुनर्वसन करावे.

**पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वेचा प्रकल्प मार्गी लावावा**

पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे संदर्भांत आपण केंद्रीय रेल्वेमंत्री यांचेशी चर्चा करुन पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेला केंद्रीय कॅबिनेटची तात्काळ मंजूरीची विनंती केली होती. मात्र उपमुख्यमंत्री महोदयांच्या दिल्लीतील चर्चेमध्ये केंद्रीय रेल्वे मंत्री महोदयांचे वेगळे मत आहे. त्यांनी पुणे-नाशिक रेल्वे इलीवेटेड करुन त्याच्या खालून हायवे करण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच हायस्पीड रेल्वे ही जमिनीवर सुरक्षित नसलेबाबत मुद्दा उपस्थित केला आहे व प्रकल्पाचा पुन्हा डीपीआर करण्याच्या सुचना दिल्या आहेत. या प्रकल्पावर एमआरआयडीसी व महाराष्ट्र शासन यांनी तीन वर्षापूर्वीच डीपीआर तयार करुन जमीन संपादनाचे काम बऱ्याच अंशी पूर्ण झाले आहे. राज्य सरकारने बजेटमध्ये भूसंपादनाची तरतूद केली आहे. सद्यस्थितीत या प्रकल्पाचे सर्व स्तरावरील रेल्वे अधिकाऱ्यांची मंजूरी झाली असून रेल्वे बोर्डाचे चेअरमन यांचीही मंजूरी मिळालेली आहे. केंद्रीय मंत्री मंडळाची मान्यता तात्काळ मिळण्यासाठी आपण पाठपुरावा करावा.

**आशा सेविकांना किमान वेतन लागू करावे**

राज्यातील आशा सेविका आरोग्य सेवेचा कणा आहेत. आशा सेविका या प्रतिदिन १० ते ४ वाजेपर्यंत म्हणजेच एकूण ६ तास पूर्ण वेळ काम करतात. दिवसभर काम करुनही त्यांना पुरेसे आणि वेळेवर मानधन मिळत नाही. कोरोना काळात या आशा सेविकांना आरोग्य व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी खूप मोठा हातभार लावला आहे. या आशा सेविकांना किमान वेतन मिळाल्यास या सेविका अधिक सक्षमपणे व जोमाने काम करतील, तरी त्यांना किमान वेतन लागू करावे.

**अहमदनगर येथील बर्डे कुटुंबियांना आर्थिक मदत मिळावी**

वांदरकडा, खंदरमाळ ता. संगमनेर, जि.अहमदनगर येथे विजेची तार पडून दिनांक ८ आक्टोबर २०२२ रोजी झालेल्या अपघातामध्ये बर्डे या एकाच कुटुंबातील ४ मुलांचा दुर्देवी मृत्यू झाला आहे. या अपघातामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून ही सर्व मुले आदिवासी कुटुंबातील असून त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. मी या कुटुंबाला प्रत्यक्ष भेट दिली आहे. या कुटुंबाला या दुःखातून सावरण्यासाठी शासनाकडून तातडीने मदत मिळणे आवश्यक आहे. या कुटुंबियांना शासनाकडून प्रत्येकी ५ लाख रुपये व महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडून चार लाख रुपये आर्थिक मदत देण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र त्यांना ती अद्याप मिळालेली नाही. तरी या कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत मिळावी.

**उल्हास नदीवरील पूर नियंत्रण रेषा संदर्भांत सर्वसामान्यांना विचारात घ्यावे**

बदलापूर शहरातून जाणाऱ्या उल्हास नदी पूर नियंत्रण रेषा संदर्भांत महाराष्ट्र राज्य पाटबंधारे विभागाने ब्लू लाईन आणि रेड लाईन अशा स्वरुपाचे मार्किंग केले आहे. उल्हास नदी पूर नियंत्रण रेषा संदर्भांत कोणताही निर्णय घेण्यापूर्वी शहरातील नागरिकांची तसेच पर्यावरण प्रेमी, नदी बचाव कृती समिती, पूर नियंत्रण विषयासंदर्भांत अभ्यास करणारे गट आदी जाणकार लोकांचेही अभिप्राय घेण्यात यावेत.

**विना अनुदानित शाळांचा प्रश्न सोडवावा**

त्रुटींची पूर्तता केलेल्या शाळांच्या याद्या जाहीर करण्यासाठी सरकारने निर्णय घेऊन शासन निर्णय निर्गमित करणेबाबत राज्याच्या शिक्षण मंत्र्यांनी पावसाळी अधिवेशनात आश्वासन दिले होते. या प्रश्नासंदर्भांत दिनांक १० ऑक्टोबर २०२२ पासून अनेक शिक्षक आझाद मैदान, मुंबई येथे अंदोलन करीत आहेत. विना अनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय आंदोलन मागे न घेण्याचा पवित्रा या शिक्षकांनी घेतला आहे. तरी त्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडवावेत.

**राज्यातील विकास कामांवरील स्थगिती उठवावी...**

जिल्हा नियोजन समितीवरील तसेच कार्यकारी समितीवरील नामनिर्देशित सदस्य व विशेष निमंत्रित सदस्य यांच्या नियुक्त्या नियोजन विभागाच्या दिनांक २७ सप्टेंबर २०२२ च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे दिनांक २ एप्रिल २०२२ पासून सुरु होणाऱ्या नविन अर्थिक वर्षातील जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेली कामे स्थगित झाली आहेत. वास्तविक निर्वाचित लोकप्रतिनिधींनी त्यांचे मतदारसंघातील विकासकामांचा प्राधान्यक्रम ठरवून ती कामे जिल्हा नियोजन समितीमार्फत मंजूर केली आहेत. ही कामे विशेषत : ग्रामीण भागाशी संबधित असतात या कामांना स्थगिती दिल्यास ग्रामीण भागातील विकासकामांना खीळ बसू शकतो त्यामुळे या कामांना स्थगिती देणे उचित होणार नाही. ग्रामविकास विभागाच्या दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये लेखाशिर्ष २५१५ १२३८- लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावातंर्गत मुलभूत सुविधा पुरविणे या लेखाशिर्षातंर्गत दिनांक १ एप्रिल, २०२१ पासून मंजूर कामे रद्द करण्यात आली आहेत. वास्तविकता सदर कामे नियमाधिन व प्राधान्याची असल्याने सदर कामे रद्द केल्यास राज्यातील विकास कामांना खिळ बसू शकते. त्यामुळे विकास कामांवरील स्थगिती तातडीने उठवावी.



# धुळे पोलिसांची कामगिरी; गुजरातच्या कारसह 18 लाखांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील आर्वी येथे तालुका पोलिसांच्या पथकाने मानवी मेंदूवर परिणाम करणाऱ्या अफुची तस्करी रोखली. गुजरातमधील कारसह 18 लाखांचा अफु जप्त करण्यात आला. मात्र चालक हातून निसटला. काल सायंकाळी कारवाई करण्यात आली. आर्वी (ता. धुळे) येथे धुळे तालुका पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी हे पेट्रोलींग करीत होते. त्या दरम्यान सायंकाळी सव्वा पाच वाजेच्या सुमारास एक महिंद्रा एक्सयुव्ही मॉडेलचे वाहन (क्र.जीजे 01 आरपी 1281) हे धुळ्याकडून मालेगावकडे जाताना दिसले. त्याबाबत संशय आल्याने पोलिसांनी त्या वाहनाला थांबण्याचा इशारा केला असता, चालकाने वाहन रस्त्याचे कडेला लावून गाडीतून उतरून पळू लागला. पोलिसांनी त्याचा पाठलाग केला परंतु तो मिळून आला नाही. त्यानंतर संशयीत वाहनाची तपासणी केली असता त्यात 18 प्लॉस्टीकच्या गोण्यात अफुच्या बोंडाचा तुकड्यांचा चुरा भरलेला आढळून आला. एकुण 9 लाख 93 हजार 180 रूपये किंमतीचा 331 किलो अफुच्या बोंडाचा तुकड्यांचा चुरा व 8 लाखांची कार असा एकुण 17 लाख 93 हजार 180 रूपये किंमतीचा मुद्येमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंद झाला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोउनि प्रकाश पाटील यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. ही कामगिरी नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक बी.जी.शेखर पाटील, पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप मैराळे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे तालुका पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक सागर काळे, असई सुनिल विंचूरकर, पोहेकॉ प्रविण पाटील, किशोर खैरनार, पोकॉ नितीन दिवसे, अमोल कापसे यांच्या पथकाने केली.

# सरसकट पंचानामे करत ५० हजार रुपये नुकसान भरपाई तत्काळ द्या

## उद्धव ठाकरे शिवसेनेचे प्रांताधिकारी यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**पाचोरा :** पाचोरा व भडगाव तालुक्यात तात्काळ ओला दुष्काळ जाहिर करुन सरसकट पंचानामे करण्यात यावे तसेच दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी. अशा शेतकऱ्यांच्या हितार्थ मागण्यांचे निवेदन उद्धव ठाकरे शिवसेनेतर्फे आज दि. १९ ऑक्टोबर रोजी उपविभागीय अधिकारी डॉ. विक्रम बांदल यांना निवेदन देण्यात आले. निवेदन देते प्रसंगी शिवसेना नेत्या वैशाली नरेंद्रसिंह सुर्यवंशी, जिल्हाप्रमुख दिपकसिंग राजपुत, शेतकरी सेनेचे जिल्हाप्रमुख अरुण पाटील, शेतकरी सेनेचे तालुकाप्रमुख रमेश बाफना, तालुका प्रमुख शरद पाटील, मा. नगरसेवक दत्ता जडे, दादाभाऊ चौधरी, व्यापारी सेनेचे आनंद संघवी, युवासेना उपजिल्हा युवाधिकारी संदिप जैन, शहर प्रमुख दिपक पाटील, तालुका संघटक हिलाल पाटील, भरत खंडेलवाल, अमरसिंग पाटील, प्रताप मोगरे, पप्पु जाधव, हरिष देवरे, नाना वाघ सह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते. आम्ही सर्व शेतकरी असून शेती हाच आमचा मुख्य व्यवसाय आहे. चालू हंगामात पावसाने मोठ्या प्रमाणात सोयाबीन, मका, ज्वारी, बाजरी, कपाशी या महत्वाच्या पिकासह फळबागांचेही आतोनात नुकसान केले आहे. त्यातून शिल्लक राहिलेले उत्पन्न गेल्या दोन दिवसापासून सुरु असलेल्या सततच्या व मुसळधार पावसाच्या माऱ्याने संपुर्णपणे पिक नष्ट झाले आहे. त्यामुळे पाचोरा - भडगांव तालुक्यातील शेतकरी हवालदील झालेला आहे. अशा अडचणीच्या अवस्थेत शेतकरी असतांना प्रशासनाने आपल्या अधिकारांचा वापर करुन शासनाच्या वरीष्ठ आदेशाची वाट न बघता तातडीने पाचोरा व भडगांव तालुक्यात ओला दुष्काळ जाहिर करावा व सरसकट पंचनामे करुन राष्ट्रीय सहाय्यता निधी व राज्याच्या मदत निधीतून व शासनाच्या अन्य तरतुदीतुन शेतकऱ्यांना दिवाळीपुर्वी एकरी ५०,०००/- (पन्नास हजार मात्र) रुपये सानुग्रह अनुदान द्यावे. तसेच पिक विमा कंपन्यांना शेतकऱ्यांच्या क्लेम प्रमाणे तातडीने पंचनामे करुन दिवाळीपूर्वी रक्कम जमा करणेबाबत आदेश व्हावेत अशा आषयाचे निवेदन उपविभागीय अधिकारी डॉ. विक्रम बांदल यांना देण्यात आले.



# उद्धव ठाकरेंच्या राजकारणात रामाच्या जागेवर राहुल!

## प्रदेश भाजपा मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांची टीका

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** प्रत्येक नेत्याला मातोश्रीवर येण्यासाठी भाग पाडणारा बाळासाहेबांचा आदरयुक्त दबदबा उद्धव ठाकरेंनी रसातळाला पोहोचवला आहे. पक्ष, संघटना किंवा कार्यकर्त्यांसाठी कधीही घराबाहेर न पडलेले उद्धव ठाकरे आता राहुल गांधींच्या पदयात्रेसाठी पायघड्या घालण्यासाठी घराबाहेर पडणार हा उद्धव ठाकरे यांच्यावर काळाने उगवलेला सूड आहे, अशी खोचक टीका प्रदेश भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी बुधवारी केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे नूतन अध्यक्ष नरेंद्र पाटील यावेळी उपस्थित होते. उपाध्ये म्हणाले की, या आधी भाजपसोबत युती असताना हिंदुत्वाच्या मुद्द्यावर उद्धव ठाकरे कधी रस्त्यावर उतरले नाहीत. लालकृष्ण अडवाणी-मुरली मनोहर जोशींच्या रथयात्रांत तर उद्धव ठाकरे फिरकले देखील नाहीत. हात उंचावून जाहीर सभांमध्ये हिंदुत्वाच्या पोकळ गर्जना करणारे उद्धव ठाकरे बाबरी प्रकरणाच्या वेळी शिवसैनिकांना रस्त्यावर उतरवून घरात टीव्ही बघत होते, तर तीन वर्षांपूर्वीच्या देवेंद्र फडणवीस यांच्या महाजनादेश यात्रेत सहभागी झाले नव्हते. 'मुंह मे राम, बगल मे राहुल' ही म्हण उद्धव ठाकरे यांच्यासाठीच शब्दशः तयार झाली असावी असा टोला हाणून ते म्हणाले, यांना रामाची नाही, तर राहुलची आरती आवडू लागली आहे. राहुल गांधींच्या पदयात्रेस हजर राहुन उद्धव ठाकरे आपल्या काँग्रेसनिष्ठेचा नजराणा सोनिया गांधींना देणार आहेत का, असा सवालही त्यांनी केला.

# एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळी गिफ्ट; पाच हजार रुपयांची दिवाळी भेट

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्य मार्ग परिवहन महामंडळातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होणार आहे. एसटी महामंडळाच्यावतीने कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना पाच हजार रुपये दिवाळी भेट देण्यात येणार असल्याचे महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांनी सांगितले. एसटी कर्मचाऱ्यांच्या दिवाळी भेटीसाठी राज्य सरकारने 45 कोटींची मदत जाहीर केली होती.

एसटी महामंडळाने दिवाळी भेट देण्याचा निर्णय घेतला, या निर्णयाचा फायदा महामंडळाच्या 87 हजारांहून अधिक अधिकारी-कर्मचाऱ्यांना होणार आहे. दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी अधिकारी व कर्मचाऱ्यांना आर्थिक स्वरूपात दिवाळीची भेट दिली जाते.

गेल्या दोन वर्षापासून कोरोना महामारीमुळे प्रवासी संख्या घटल्याने एसटीला आर्थिक समस्येला सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीतही महामंडळाकडून यंदा सरसकट अधिकारी व कर्मचारी वर्गाला 5 हजार रुपये दिवाळी भेट देण्याचा निर्णय घेतला आहे. ही रक्कम लवकरच त्यांच्या बँक खात्यात जमा केली असल्याची माहिती व्यस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांनी दिली. मागील वर्षी दिवाळीच्या दरम्यान एसटी कर्मचाऱ्यांनी वेतनवाढ, विलिनीकरण आदींसह इतर मागण्यांसाठी आंदोलन सुरू केले होते. हे आंदोलन बरेच दिवस चिघळले होते. त्याच्या परिणामही एसटी महामंडळाच्या उत्पन्नावर झाला होता. दरम्यान, याआधी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी 2500 रुपये आणि 5000 रुपयांची दिवाळी भेट देण्यात येत होती. यंदाच्या वर्षी मात्र कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची दिवाळी भेट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### दिवाळीनिमित्त एसटीची जादा वाहतूक

दिवाळी आणि जोडून येणाऱ्या सुट्ट्यांचा कालावधी पाहता गावी किंवा पर्यटनासाठी जाणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने यंदा राज्यभरात दिवाळीनिमित्त 1494 जादा ( बस गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे . ही जादा वाहतूक 21 ऑक्टोबर ते 31 ऑक्टोबर 2022 दरम्यान चालवण्यात येणार आहे .

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे ऑक्टोबर महिन्याचा पगार 21 ऑक्टोबर रोजी होणार आहे . ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात दिवाळी येत आहे, त्यामुळे त्याच्या आधीच कर्मचाऱ्यांचा पगार करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे . राज्य सरकारच्या या निर्णयाचा फायदा हा जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांपासून ते शिक्षण संस्था, महाविद्यालयं आणि इतर सर्वच कर्मचाऱ्यांना होणार आहे .



# नाशिक-मुंबई मार्गावरील खड्ड्यांची छगन भुजबळ यांच्याकडून पाहणी

आधुनिक केसरी न्यूज



**नाशिक :** माजी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी नाशिक-मुंबई महामार्गावर ठीकठीकाणी असलेल्या खड्ड्यांची स्वतः पाहणी केली. महामार्गाची सुधारणा झाली नाही तर टोल बंद करू असा इशारा, यावेळी छगन भुजबळ यांनी दिला आहे.

नाशिक-मुंबई महामार्गावर पावसामुळे पडलेल्या खड्ड्यांची महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना घेऊन पाहणी केली. यावेळी अधिकाऱ्यांची कान उघाडणी करत त्वरित रस्त्यांची सुधारणा करण्यात यावी, अशा सूचना छगन भुजबळ यांनी दिल्या. छगन भुजबळ यांनी स्वतः महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना खड्डे दाखवून फैलावर घेतले. नाशिक मुंबई महामार्गाची ३१ ऑक्टोबरपर्यंत दुरुस्ती करा, अशा सूचना छगन भुजबळ यांनी महामार्ग प्रशासनाला यावेळी दिल्या आहेत. जर ऑक्टोबर अखेरपर्यंत रस्त्यांची दुरुस्ती झाली नाही तर एक नोव्हेंबरपासून नाशिक-मुंबई महामार्गावर असलेले टोल बंद करू, असा इशारा माजी छगन भुजबळ यांनी महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना खड्डे दाखवत दिला आहे.

नाशिक-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. नाशिक मुंबई प्रवास करणाऱ्या तसेच नोकरी निमित्ताने ये- जा करणाऱ्या चाकरमान्यांसह मालवाहतूक करणाऱ्या वाहनधारकांनाही याचा प्रचंड प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागत आहे. एवढे असूनही महामार्ग प्राधिकरणाकडून कुठल्याही उपायोजना केल्या जात नसल्याने नागरिकांना या रस्त्यांवरून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. या महामार्गावरून प्रवास करत असताना खड्ड्यांमुळे अनेक लहान-मोठे अपघात होत असतात. तसेच वाहन चालकांच्या वाहनाचे देखील लहान - मोठ्या प्रमाणात खड्ड्यांमुळे नुकसान होत असते. त्यामुळे हा महामार्ग प्रवास करणाऱ्यांसाठी डोकेदुखी ठरलेला आहे. यामुळे छगन भुजबळ यांनी महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन पाहणी केली.

नाशिकहून मुंबईकडे जात असताना छगन भुजबळ यांनी रस्त्याचा आढावा घेतला. परंतु रस्त्याची परस्थिती तशीच दिसल्याने त्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरलं. आणि ३१ ऑक्टोंबरपर्यंत रस्ते दुरुस्ती करण्याचा अल्टिमेटम दिला आहे. अन्यथा एक नोव्हेंबरपासून टोल बंद करण्यात येईल, असा इशारा भुजबळ यांनी दिला आहे.

# भुसावळच्या माजी नगराध्यक्षांसह दहा नगरसेवक अपात्र

## राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते एकनाथ खडसेंना मोठा धक्का

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव :** भुसावळ येथील माजी नगराध्यक्षांसह दहा नगरसेवकांना सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री तथा आमदार एकनाथ खडसे यांना मोठा धक्का मानला जात आहे. ते सर्व खडसे यांचे समर्थक होते. माजी नगराध्यक्षांसह दहा नगरसेवकांना सहा वर्षे निवडणूकबंदी राहील. तत्कालीन भाजपच्या नगराध्यक्षांनी सतरा डिसेंबर २०२१ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केला होता. याबाबत भाजपच्या नगरसेविका पुष्पा बत्रा यांनी २८ डिसेंबर २०२१ रोजी संबंधित माजी नगराध्यक्ष व नगरसेविकांविरोधात अपात्रतेची याचिका दाखल केली होती. नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी याप्रकरणी अंतिम सुनावणी करीत माजी नगराध्यक्षांसह दहा नगरसेवकांना सहा वर्षांपासून निलंबित केल्याचे आदेश दिले आहेत. भुसावळ येथे २०१६ मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपच्या कमळ या चिन्हावर रमण भोळे हे लोकनियुक्त नगराध्यक्ष झाले होते. त्यांच्यासोबत भाजपचे पंचवीस नगरसेवक निवडून आले होते. मात्र, त्यांची मुदत पूर्ण होण्यापूर्वीच सतरा डिसेंबर २०२१ रोजी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. यामुळे त्यांना अपात्र करावे यासाठी भाजपच्या नगरसेविका पुष्पा बत्रा यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल केला होता. त्यावर सुनावणी होऊन जिल्हाधिकाऱ्यांनी १८ जुलै २०२२ रोजी निर्णय दिला होता. या निकालात तत्कालीन नगराध्यक्ष रमण भोळे यांच्यासह नगरसेवक बोधराजू चौधरी, अमोल इंगळे, प्रमोद नेमाडे, लक्ष्मी मकासरे, शोभा नेमाडे, मेघा् वाणी, किरण कोलते, शैलजा नारखेडे, सविता मकासरे यांना अपात्र करण्यात आले होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयाला या दहाही जणांनी नगरविकास विभागाकडे दाद मागितली होती. यावर दोन्ही बाजूंची सुनावणी झाल्यानंतर नगरविकास विभागाच्या प्रधान सचिव डॉ. सोनिया सेठी यांनी या सर्वांचे अपील फेटाळत जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय कायम ठेवला आहे.

# मुंबईतून तीन लाखांचे भेसळयुक्त तूप जप्त



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ऐन दिवाळीच्या तोंडावर मुंबईतून सुमारे तीन लाख रुपयांचे संशयित भेसळयुक्त तूपजप्त करण्यात आले आहे. मुंबईतील अन्न व औषध प्रशासनाने ही कारवाई केली आहे. दिवाळीच्या तोंडावर अन्न व औषध प्रशासनाच्या मुंबई कार्यालयाने अन्नसुरक्षा कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या तुपावर कारवाई केली आहे. मुंबईतील प्रशासनाच्या दक्षता विभागाला मिळालेल्या माहितीनुसार मस्जिद बंदर इथल्या ऋषभ शुद्ध तूप भांडार गोडाऊनवर ही कारवाई करण्यात आली. गोदामातून 2 लाख 99 हजार 90 रुपये किंमतीचा 400 किलो तूप जप्त करण्यात आला आहे. यासोबतच तुपाचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. हे नमुने विश्लेषणासाठी पाठवण्यात आले असून अहवालाच्या अनुषंगाने पुढील आवश्यक कारवाई केली जाईल. दिवाळीसारख्या सणाच्या दिवसात ग्राहकांना सुरक्षित आरोग्यदायी आणि सकस अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत यासाठी अन्न नमुने तपासण्याची विशेष मोहीम हाती घेतली आहे. तसंच अन्न सुरक्षा आणि मानके कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाईचे निर्देश सहआयुक्त शशिकांत केकरे यांनी दिले आहेत. या काळात मिठाईला मोठ्या प्रमाणात मागणी होत असल्याने त्याचा गैरफायदाही घेतला जातो. यामुळे या मिठाईत बनावट पदार्थ मिसळण्याची शक्यताही असते. बाजारात असलेली मिठाई शुद्ध खव्यापासून किंवा शुद्ध तुपापासूनच बनवलेली असेल याची कोणतीही शाश्वती नसते. अशातच व्यापाऱ्यांकडून भेसळयुक्त आणि बनावट पदार्थ ग्राहकांच्या माथी मारण्याचा प्रयत्न होत असतो.

# ग्रामीण रुग्णालय वाशी येथे नवीन डेंटल चेअरचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**वाशी :** ग्रामीण रुग्णालय वाशी येथे नवीन डेंटल चेअर चे लोकार्पण नगराध्यक्षा श्रीमती विजयाताई गायकवाड, नगरसेवक नागनाथ नाईकवाडी, तुळशीदास करडे, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रमोद शिंदे सर, दंत शल्यचिकीत्सक डॉ. सोनाली गाढवे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गोवर्धन महिंद्रकर सर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच दि. 20/10/2022 पासून ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियानात अंतर्गत वाशी शहरातील 18 वर्षावरील सर्व महिलांची आरोग्य तपासणी वार्ड निहाय करण्यात येणार आहे. त्यासंदर्भात डॉ. प्रमोद शिंदे सर यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. परमेश्वर तुंदारे यांनी प्रस्ताविक केले, यावेळी रुग्णालयीन अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियानांतर्गत शहरातील सर्व महिलांनी आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी असे आवाहन वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रमोद शिंदे सर व तालुका आरोग्य अधिकारी डॉ महिंद्रकर सर यांनी केले आहे.

